cmyk

## संपादकीय

### वक्फ बोर्ड विधेयक : ऐतिहासिक पाऊल

केंद्र सरकारने अखेर ऐतिहासिक वक्फ बोर्ड विधेयक संसदेत विविध अशा १४ दुरुस्त्यांसह सादर केले. हे विधेयक याच अधिवेशनात मांडले जाईल आणि पास केले जाईल अशी घोषणा यापूर्वीच केंद्रसरकारने केली होती. देशातील बहुतांश मुस्लिम संघटनांनी व नागरिकांनी या विधेयकाला जोरदार विरोध दर्शविला आणि मतांवर डोळा ठेवून उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक विरोधी राजकीय नेत्यांनी अपेक्षेप्रमाणे या कायद्याला विरोध दर्शविला. विरोधाला विरोध दर्शविणे हाच त्या पाठीमागे मुख्य उद्देश आणि मुस्लिम धर्मियांच्या विरोधात हे कारस्थान अशा पद्धतीची निवेदने विरोधी काँग्रेससह इतर पक्षांच्या नेत्यांनी केलेली आहेत.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### अर्थव्यवस्था धोक्यात आणणाऱ्या टॅरिफबाबत केंद्र सरकार काय करणार?

नवी दिल्ली । वृत्तसेवा

अमेरिकेने भारतीय निर्यातीवर रेसिप्रोकल टॅरिफ लावण्याचा घेतलेला निर्णय आमच्या अर्थव्यवस्थेचा विध्वंस करणार आहे, असे प्रतिपाद विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गुरूवारी लोकसभेत बोलताना केले. तुम्ही चीनला ४००० चौरस किलोमीटर जमिन दिली. आमचा मित्रदेश (अमेरिका) अचानक आमच्यावर २६ टक्के कर लावण्याचा निर्णय घेतो. ज्यामुळे आमची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होईल, ऑटोमोबाईल-फार्मा उद्योग धोक्यात आहेत. केंद्र सरकार याबाबत काय करणार आहे? यावर राहुल यांनी केंद्र सरकारकडून उत्तर मागितले.

बीड – महाराष्ट्र वर्ष –४ अंक–३३९ शुक्रवार, दि.०४ एप्रिल २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–८ किंमत ३ रूपये

# पंधरा दिवसात पीकविम्याचे पैसे द्या !

## कार्पोरेट कंपन्यांच्या कार्यालयात घुसून पैसा वसूल करण्याचा राजू शेट्टी यांचा इशारा

वाशिम । प्रतिनिधी

पीक विम्याची रक्कम ३१ मार्चपर्यंत शेतकऱ्यांना मिळेल, असे आश्वासन कृषी मंत्र्यांनी दिले होते. मात्र, कंपनी म्हणते सरकारने त्यांच्या हिश्याचे पैसे भरले नाहीत. त्यामुळे पैसे देऊ शकत नाही. खरीप, रब्बीचा हंगाम संपला तरी पैसे मिळत नाहीत. येत्या पंधरा दिवसांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याचे पैसे जमा झाले नाहीत, तर मुंबईतील कार्पोरेट कंपन्यांच्या कार्यालयामध्ये घुसून पैसा वसूल करू, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष व माजी खासदार राजू शेट्टी यांनी गुरूवारी (दि.३) वाशिम येथे पत्रकार परिषदेत दिला.



### भावाची श्वेत पत्रिका काढा

देशाचे कृषिमंत्री संसदेत सांगतात गेल्या पाच वर्षांमध्ये शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले. मग त्यांनी पाच वर्षांपूर्वी शेतमालाला मिळणारा भाव आणि आज मिळणारा भाव याची श्वेतपत्रिका काढावी. म्हणजे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले की खर्च वाढला, हे कळेल, असे शेट्टी म्हणाले.

महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन दिले होते. आता अर्थमंत्री अजित पवार राज्याची आर्थिक स्थिती बरोबर नसल्यामुळे आम्ही हे आश्वासन पाळू शकत नाही, असे सांगत आहेत. पवार गेल्या अनेक वर्षांपासून अर्थमंत्री आहेत. मागच्या सरकारमध्येही ते अर्थमंत्री होते. त्यांना राज्याच्या एकूण आर्थिक स्थितीची खडान खडा माहिती होती. मग महायुतीने जाहीरनाम्यात कर्जमाफीचे आश्वासन देऊन शेतकऱ्यांची मत घेऊन शेतकऱ्यांचा विश्वासघात का केला? असा सवाल शेट्टी यांनी यावेळी केला. ते म्हणाले की, शेतकऱ्यांना मदत देताना सरकार नेहमीच अडचणी सांगते. राज्यातील शेतकऱ्यांवर वारंवार संकटे येत आहेत मात्र सरकारला याचे काहीच देणेघेणे नाही. शेतकऱ्याला प्रत्येक वेळी केवळ आश्वासनच दिले जाते. सरकारची शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची तयारी नव्हती तर तशी घोषणा का करण्यात आली. दुसरीकडे निवडणूक डोळ्यासमोर ठेवून लाडकी बहिण सारखी योजना जाहीर करण्यात आली. आता ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### सोलापूरमध्ये भूकंपाचे धक्के

सोलापूर –जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के बसल्याची माहिती प्रशासनाने दिली. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे भूकंपाचे केंद्रबिंदू होता. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने याबाबतचे ट्विट करत माहिती दिली आहे. पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा येथे २.६ रजिस्टर स्केल तीव्रतेचे धक्के जाणवले.

### पंढरपूर मंदिरात नारळ फोडण्यास बंदी

पंढरपूर–पंढरपूरात ७ ते ९ एप्रिल दरम्यान मास व मद्या विक्रीस बंदी करण्यात आली आहे. चैत्र यात्रेच्या पाश्वभूमीवर मंदिर प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. तसेच यात्रा कालावधी दरम्यान मंदिर परिसरात नारळ फोडण्यास बंदी केली आहे.

### महाराष्ट्र वैद्यक परिषदेची मतदान प्रक्रिया थांबवली

मुंबई–महाराष्ट्र वैद्यक परिषदेच्या (महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल–एमएमसी) नियामक मंडळाच्या आजच्या मतदान प्रक्रियेला सुप्रीम कोर्टाने बुधवारीच स्थगिती दिलेली असतानाही आदेशाचा चुकीचा अन्वयार्थ लावून आज, गुरुवारीच मतदान प्रक्रिया राबवण्याचा निर्णय राज्य सरकारच्या अंगलट आला आहे. सुप्रीम कोर्टाने सरकारी प्रशासनाच्या या वर्तणुकीची गुरुवारी अत्यंत गंभीर दखल घेतली आणि गुरुवारी सुरू असलेली मतदानप्रक्रिया तात्काळ थांबवण्याचा आदेशही दिला.

### वक्फ बिलावर उद्धव ठाकरेंचा आक्षेप

मुंबई–वक्फ बिलाबाबत उद्धव ठाकरे यांनी आक्षेप घेत भाजपावर टीका केली आहे. वक्फ बिलं मुस्लिमांच्या हिताचे आहे मग हिंदूत्व सोडले का? असा सवाल उद्धव ठाकरेंनी भाजपाला विचारला आहे. देशातील इतिहासात मुस्लिमांचा कळवळा घेणारी भाषण भाजपने केली. अमित शाहपासून सर्वांनी केली. जिनांनाही लाजवेल अशी ही भाषणे होती. हे मुस्लिमांच्या बाजूने आहेत का? मग हिंदुत्वाचे काय झाले. हिंदूत्व सोडले का? बाळासाहेबांनी मुस्लिमांना इज्तेमा करण्याची परवानगी दिली होती. तीच जागा व्यापाऱ्यांसाठी उद्योगपतीच्या खिशात घातली, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी भाजपावर टीका केली आहे.

### परळीत सिलेंडरचा स्फोट

परळी–शहरातील माणिक नगर भागात सिलेंडरचा स्फोट झाला. या स्फोटामध्ये घरातील संसार आणि उपयोगी साहित्य जळून खाक झालं आहे. सत्यभामा कुंभार आणि राणी किसन कुंभार या दोघीजणी या स्फोटात बचावल्या आहेत. मात्र याठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या घरालाच आग लागल्याने या दोघीही उघड्यावर पडल्या आहेत.

# अंजली दमानिया थेट अंतरवाली सराटीत

## मनोज जरांगे, धनंजय देशमुखांची घेतली भेट; चांगल्या माणसाला भेटायला प्राब्लेम नाही–दमानिया

जालना । प्रतिनिधी

संतोष देशमुख खून प्रकरणात सातत्याने बाजू लावून धरणाऱ्या अंजली दमानिया यांनी थेट आंतरवली सराटीत जावून मनोज जरांगे यांची भेट घेतली आहे. यावेळी धनंजय देशमुखही उपस्थित होते. जरांगे –दमानिया भेटीमुळे धनंजय मुंडे यांच्या अडचणीत वाढ होणार असल्याचे बोलले जात आहे. आम्ही आतापर्यंत कधीही भेटलो नव्हतो, फक्त फोनवर चर्चा झाली होती. म्हणून मी आज ठरवून भेटू घेतली, सगळ्यात चांगल्या माणसांना भेटायला कधीच काही प्रॉब्लेम नसतो, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.





बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाचा लढा लावून धरणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी गुरुवारी जालन्यात जाऊन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली.

संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आणि अंजली दमानियांनी थेट धनंजय मुंडेंचे नाव घेऊन त्यांच्यावर गंभीर आरोप केले होते. तसेच, त्यांच्या राजीनाम्याची देखील मागणी केली होती. तर, गेल्याच आठवड्यात कळंब येथील महिलेची हत्या झाल्यानंतर अंजली दमानिया यांनी ट्विट करुन संबंधित महिलेचा वापर करुन दिवंगत संतोष देशमुख यांचे चारित्र्यहनन ◀◀ पान २ वर

### सहआरोपींमुळे धागेदोरे थेट धनंजय मुंडेंपर्यंत

पोलिसांनी असे अर्धवट स्टेटमेंट का घेतले, मी मागे म्हटले होते की १० लोकं आहेत, त्यांना सहआरोपी करणे गरजेचे होते. व्हिडिओमध्ये राजेश पाटील दिसले, प्रशांत महाजन दिसले, हे सगळे असताना सुद्धा या कोणालाच, शिवलिंग मोराळे असो बालाजी तांदळे असो असे असंख्य लोक आहेत. डॉक्टर वायबसे असो कोणालाही सह आरोपी केलेले नाही. यांना जर सहआरोपी केल तर याचे धागेदोरे थेट धनंजय मुंडे पर्यंत जातात, म्हणून हे मुद्दाम केले गेले नाही, असा आरोपही दमानिया यांनी केला आहे.

### भेटीनंतर जरांगे पाटील यांची प्रतिक्रिया

तब्येतीची विचारपूस करण्यासाठी ताई मुंबईहून जालन्यात आल्या होत्या. अंजली ताईंच्या कामाचा आवाका मोठा आहे, तरी पण त्यांनी ठरवलं भेटायला जाऊ आणि त्या भेटीसाठी आल्या. बीडला शिक्षकाच्या कार्यक्रमांमध्ये माझे अंग गार पडले होते, त्यानिमित्ताने ताई तब्येतीची विचारपूस करायला, मला भेटायला आल्या दुसरे काही नव्हते, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे पाटील यांनी भेटीनंतर दिली आहे.

# पंकजाताई मुंडेंचा परळीत हाऊसफुल्ल जनता दरबार

## जनतेच्या समस्यांचा जागेवरच निपटारा



परळी । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचा आज परळीत हाऊसफुल्ल जनता दरबार झाला. त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी यश:श्री निवासस्थान अक्षरशः गर्दीने फुलून गेले होते. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निपटारा केला.

ना. पंकजाताई मुंडे यांचे बुधवारी रात्री उशीरा शहरात आगमन झाले. आज सकाळपासूनच यश:श्री निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी मतदारसंघातील, जिल्हयातील तसेच जिल्हया बाहेरून नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची ◀◀ पान २ वर

# पुरस्काराचे एक लाख रुपये वैभवी देशमुखच्या शिक्षणासाठी

## डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या सामाजिक दायित्वाचे सर्वत्र स्वागत

बीड । प्रतिनिधी

आपल्याला मिळालेला पुरस्कार हा देशभक्त रतनजी टाटा यांच्या प्रेरणेने व संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली केलेल्या आरोग्यसेवेचे फलित आहे. त्यामुळे हा पुरस्कार त्यांना समर्पित करणे माझे परमकर्तव्य आहे. तसेच पुरस्कारातून मिळालेली एक लाख रुपयांची रक्कम ◀◀ पान २ वर



# गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचा बीड जिल्हा दौरा: मस्साजोग येथे सांत्वन भेट

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम हे ४ एप्रिल रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यांच्या या दौऱ्यात मस्साजोग येथे जाऊन ते स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची सांत्वन भेट घेणार आहे.

गृहराज्यमंत्री योगेश कदम हे संभाजीनगर येथून हेलिकॉप्टरने बीड येथे दाखल होणार आहेत. जिल्हा प्रशासन व पोलिस विभागाने त्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आवश्यक सुरक्षा व्यवस्था व नियोजन आखले आहे. मस्साजोग येथे पोहोचून ते स्व. संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना सांत्वनपर भेट देतील व त्यांच्या दुःखात सहभागी होतील. सांत्वन भेटीनंतर योगेश कदम हे बीड येथून हेलिकॉप्टरने जालना येथे रवाना होणार आहेत. त्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली असून, जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था सुरळीत राहील यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. गृहराज्यमंत्री यांच्या या दौऱ्यामुळे स्थानिक राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे. संतोष देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन योगेश कदम हे त्यांना आधार देण्याचा प्रयत्न करणार आहेत.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या दूरदर्शी प्रयत्नाला यश

## बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधाऱ्याचा आ.क्षीरसागरांनी केला शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या पात्रात पूल कम बंधारा बांधणीच्या कामाला अखेर सुरूवात झाली असून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.३) रोजी या कामाचा शुभारंभ केला. आ.क्षीरसागर हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने यासंदर्भात पाठपुरावा करत आहेत. या कामाची सुरूवात झाली असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. ◀◀ पान २ वर

### बंधारा कम पुलामुळे बीड शहरासह परिसरातील गावांची भूजल पातळी वाढणार



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ एप्रिल २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९७.०० क्विंटल | २,२६० | ३,००० | २,६०२ |
| ज्वारी/हायब्रिड:३८१.०० क्विंटल | १,७९० | ३,४९० | २,७९७ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ८.०० क्विंटल | ६,६०० | ७,३०० | ७,०९२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ५१.५० क्विंटल | १,९०० | २,७९१ | २,४१३ |
| मुग :४.५० क्विंटल | ६,५०१ | ७,४५१ | ६,९७६ |
| सोयाबीन:१७४.०० क्विंटल | ४,४५० | ४,६०० | ४,५२८ |
| हरभरा: २२.०० क्विंटल | ५,४०० | ६,३०० | ५,६३२ |

# सुप्रीम कोर्टातील न्यायाधीश संपत्ती जाहीर करणार

नवी दिल्ली

देशाच्या सरन्यायाधीशांसह सर्वोच्च न्यायालयाच्या ३० विद्यमान न्यायमूर्तींनी आपल्या संपत्तीची माहिती न्यायालयाच्या संकेतस्थळावर सार्वजनिक करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी न्यायमूर्ती केवळ भारताच्या सरन्यायाधीशांकडे संपत्ती जाहीर करत होते. संपत्तीची माहिती सार्वजनिक करण्याची सक्ती नव्हती.



सर्वोच्च न्यायालयाचे सर्व ३० न्यायमूर्ती आता आपल्या संपत्तीची माहिती न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करतील. न्यायपालिकेतील पारदर्शकता वाढवण्याच्या दिशेने हा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला असून,

### सरन्यायाधीशांचाही समावेश

भविष्यातील न्यायमूर्तींसाठीही ही प्रक्रिया लागू असेल. १९९७ च्या ठरावानुसार सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना सरन्यायाधीशांकडे त्यांची संपत्ती जाहीर करणे बंधनकारक होते. २००९ च्या ठरावानुसार न्यायमूर्तींना त्यांच्या संपत्तीची माहिती न्यायालयाच्या संकेतस्थळावर स्वेच्छेने प्रकाशित करण्याची मुभा देण्यात आली होती, मात्र याचे पालन सातत्याने होत नव्हते. सध्या संकेतस्थळावर अशा जाहीरनाम्यांसाठी एक स्वतंत्र विभाग आहे, पण त्याचे अद्ययावतीकरण अनियमित आहे. नवीन ठरावानुसार, सर्वोच्च न्यायालयाने सार्वजनिक जबाबदारी स्वीकारत न्यायपालिकेतील पारदर्शकता सुनिश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ होईल, असे बोलले जात आहे.

### सरन्यायाधीशांनी संपत्तीची केली नोंद

सरन्यायाधीश संजीव खन्ना, तसेच न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई, बी. व्ही. नागरत्ना, विक्रम नाथ आणि जे. के. महेश्वरी यांनी आधीच आपल्या संपत्तीच्या जाहीरनाम्यांची नोंद केली आहे. संपूर्ण माहिती लवकरच सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

cmyk

## अग्रलेख

# वक्फ बोर्ड विधेयक : ऐतिहासिक पाऊल

केंद्र सरकारने अखेर ऐतिहासिक वक्फ बोर्ड विधेयक संसदेत विविध अशा १४ दुरूस्त्यांसह सादर केले. हे विधेयक याच अधिवेशनात मांडले जाईल आणि पास केले जाईल अशी घोषणा यापूर्वीच केंद्रसरकारने केली होती. देशातील बहुतांश मुस्लिम संघटनांनी व नागरिकांनी या विधेयकाला जोरदार विरोध दर्शविला आणि मतांवर डोळा ठेवून उद्धव ठाकरे यांच्यासह अनेक विरोधी राजकीय नेत्यांनी अपेक्षेप्रमाणे या कायद्याला विरोध दर्शविला. विरोधाला विरोध दर्शविणे हाच त्या पाठीमागे मुख्य उद्देश आणि मुस्लिम धर्मियांच्या विरोधात हे कारस्थान अशा पद्धतीची निवेदने विरोधी काँग्रेससह इतर पक्षांच्या नेत्यांनी केलेली आहेत. हे विधेयक संसदेत सादर करताना विरोधी पक्षाच्या नेत्यांनी संसदेत गोंधळ घातला. हे सर्व अपेक्षित होतेच मात्र हे विधेयक नेमके कशासाठी आणले याबाबतची सविस्तर माहिती केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्री किरण रिजिजू यांनी संसदेत दिली होती. बुधवारी केंद्राने हे विधेयक संसदेत संमतीसाठी आणले. हे विधेयक मुस्लिमांविरोधात आहे असे भासवण्याचा प्रयत्न विरोधी पक्षाकडून सातत्याने होत राहिला.

आजपर्यंत वक्फ बोर्डाचे नियंत्रण हे पूर्णत: मुस्लिम समाजाकडे होते आणि हे मंडळ ज्या जागा दिसतील त्यावर त्यांनी दावा केला की मग ती मालमत्ता वक्फ बोर्डाकडे वर्ग व्हायची. आता जे विधेयक संसदेत आणलेले आहे त्यातून व्यवस्थापनात बदल होईल. एकंदरित वक्फ बोर्डाच्या कारभारात बरीच सुधारणा होईल आणि वक्फच्या नावावर जमिनी बळकवण्याचे होणारे प्रकार रोखले जातील. कारण प्रथमच वक्फच्या जमिनी खरोखरच त्यांच्या आहेत की नाही याची समीक्षा केली जाईल आणि त्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना राहतील. आजपर्यंत ते केले जात नव्हते म्हणजे यामध्येदेखील लोकशाही पद्धतीने निर्णय होतील आणि या नव्या विधेयकामुळे वक्फ बोर्डाचे जे कमिशनर आहेत त्यांचे अधिकार आता संपुष्टात येतील. वक्फ सुधारणा विधेयकात बोर्डावर आता गैर मुस्लिमदेखील सदस्य होतील. केंद्रीय परिषद आणि राज्यस्तरीय बोर्डावरदेखील किमान दोन सदस्य हे इतरधर्मीय असू शकतील, जेणेकरून काही तज्ञ व्यक्तींना या बोर्डावर आणता येईल. त्याचबरोबर सध्या वक्फ बोर्डाकडे असलेल्या जमिनी किंवा या बोर्डासाठी दान दिलेल्या जमिनी यांना आता कायदेशीरपणे वक्फची मालमत्ता असे जाहीर केले जाईल. हा या विधेयकाचा आणखीन एक लाभ आहे. मुस्लिम समुदायाने गैर मुस्लिमांचा बोर्डावर समावेश करण्यासाठी घेतलेला आक्षेप केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांनी जो फेटाळून लावलेला आहे, त्यामागील उद्देश एवढाच आहे की जे कोणी त्यावर सदस्य असतील ते तज्ञ व्यक्ती असतील आणि मंडळावर मुस्लिम समुदायाचेच बहुमत राहील. केवळ बोर्डाच्या कारभारात पारदर्शकता आणणे हा उद्देश आहे. कारण काही ठिकाणी या बोर्डाच्या मालमत्तेचा गैरवापर मोठ्या प्रमाणात झाला होता आणि मुस्लिम समाजालादेखील ते पसंत नव्हते. परंतु धर्म मार्तंडाने त्यावर अधिकार गाजवल्याने सर्वसामान्य मुस्लिम नागरिकांनादेखील त्यावर भाष्य करता आले नव्हते. या नव्या विधेयकाचा लाभ खरेतर मुस्लिम समुदायालाच होणार आहे आणि वक्फच्या संपत्तीचे यानंतर योग्य पद्धतीने रेकॉर्ड राहील आणि कोणीही जमीन हडप करू शकणार नाही. गैरमार्गाने त्याचा लाभही कोणी घेऊ शकणार नाही असे अनेक उद्देश या विधेयकात समाविष्ट आहेत. प्रथमच या बोर्डावर तीन खासदार, सर्वोच्च आणि उच्च न्यायालयातील दोन सेवानिवृत्त न्यायमूर्ती आणि एका वकिलाचादेखील समावेश राहील. केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांनी जी माहिती दिली त्यानुसार देशात सर्वाधिक जमीन ही भारतीय रेल्वेकडे आहे. त्यानंतर संरक्षण मंत्रालयाकडे आणि वक्फ बोर्डाकडे आहे. लष्कराकडे असलेल्या जमिनी या भारतीय संरक्षणासाठी वापरल्या जातात आणि एवढ्या मोठ्या जमिनी वक्फ बोर्डाकडे असूनदेखील देशातील मुस्लिम गरीब का राहिले? या प्रश्नाचे उत्तर मात्र ना विरोधकांकडे ना मुस्लिम समाजाचे नेतृत्व करणाऱ्यांकडे. गेल्या कित्येक वर्षात खुद्द मुस्लिम समुदायाकडूनदेखील या कायद्यात दुरूस्ती व्हावी अशी जोरदार मागणी होती. या कायद्याचा आणखीन एक लाभ असा आहे की प्रथम वक्फ बोर्डावर मुस्लिम महिलांनादेखील स्थान मिळणार आहे. या नव्या विधेयकामुळे आता वक्फ बोर्डाला कोणत्याही मालमत्तेवर यानंतर दावा करता येणार नाही. दावा केला तरीदेखील त्यावर सुनावणी होईल आणि जिल्हाधिकाऱ्यांना त्याची पासणी करून नंतरच निर्णय द्यावा लागेल. तसेच वक्फ बोर्डाचा निर्णय हा आजवर अंतिम राहिला होता परंतु यानंतर त्यांच्या दाव्याला दिवाणी न्यायालय किंवा उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात देखील आव्हान देता येईल. आज वक्फ बोर्डाकडे काही प्रमाणात सरकारी जमिनीदेखील आहेत. यानंतर या जमिनीबाबतदेखील पुनर्विचार होईल. त्याचबरोबर आदिवासी समाजाच्या व त्यांच्या क्षेत्रातील जमिनीवर यानंतर वक्फ बोर्डाला दावा करता येणार नाही आणि राज्य पातळीवर व जमिनीच्या एकंदरीत दाव्यावर एका वरिष्ठ सनदी अधिकाऱ्याकडून सविस्तर माहिती अहवाल राज्य सरकार घेऊ शकतो. त्यासाठी त्या अधिकाऱ्याची निवड करण्याचे अधिकार आता राज्य सरकारला राहतील असे अनेक बाबींचा समावेश असलेले हे विधेयक बदलाच्या दिशेने ऐतिहासिक असेच आहे.

# संत भगवान बाबांच्या शिकवणीमुळेच समाज आज स्वाभिमानाने प्रगती करतोय- ना. पंकजाताई मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

**'एकर विका, पण शिक्षण शिका' ही शिकवण राष्ट्रसंत भगवान बाबांनी दिली. या शिकवणीमुळेच समाज आज प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहे. आपण ऊस तोडणारे आहोत, कष्टाळू आहोत पण स्वाभिमानाने जगणारे आहोत. आजच्या तरूण पिढीने चुकीच्या गोष्टींच्या आहारी न जाता स्वत:ची प्रगती साधावी असा मोलाचा संदेश राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे दिला.**



महाराष्ट्र शासन पर्यटन संचलनालय मार्फत प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या कामाचे लोकार्पण आणि नवीन कामांचे भूमिपूजन ना. पंकजाताई मुंडे यांच्या मोठया उत्साहात संपन्न झाले, त्यावेळी त्या बोलत होत्या. प्रतिष्ठानचे डॉ. प्रभाकर धायतडक, आर टी गर्जे, डॉ. अमोल लहाने, डॉ शिवाजी सानप, शिवरूद्रानंद महाराज, योगेश क्षीरसागर, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते. प्रारंभी प्रतिष्ठानच्या वतीने विकास कामांना निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांचा सत्कार करून आभार मानण्यात आले. यावेळी त्यांच्या हस्ते विकास कामांच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.

पुढे बोलतांना पंकजाताई म्हणाल्या, संत भगवान बाबा प्रतिष्ठानच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करताना अतिशय आनंद होत आहे. संत भगवान बाबांना अभिप्रेत असलेला प्रगत, शिक्षित व स्वाभिमानी समाज घडविण्यात काहीतरी योगदान देता येत आहे याचे समाधान आहे. स्वर्गीय मुंडे साहेबांनंतर तुम्ही सर्व लोकांनीच मला मायेचे पांघरून घातले. खंबीर पाठीशी उभे राहून मला शक्ती दिली. त्यामुळे मीही प्रामाणिकपणाने जे जे शक्य असेल तिथे सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम करत मार्गक्रमण करत आहे. कधीही स्वाभिमान सोडला नाही. ऊसतोड कामगार घटकाच्या न्याय हक्कासाठी सदैव प्रयत्नशील राहून त्यांच्या जीवनात उन्नती आणण्याचा आपला प्रयत्न आहे. कष्ट, मेहनतीची तयारी आणि स्वाभिमान या त्रिसूत्री वरच आपला समाज सर्वच क्षेत्रांमध्ये प्रगती साधत आहे. संस्कारक्षम पिढी घडविण्याचे कार्य भगवान बाबा प्रतिष्ठानच्या माध्यमातून झाले पाहिजे. भगवान बाबांच्या नावाने असलेल्या या प्रतिष्ठानच्या विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्याचे भाग्य मला लाभल्याचेही पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगितले.

## पान १ वरून...

### पंधरा दिवसांत

त्यासाठी पैसे लागतात म्हणून वेगवेगळे चुकिचे मार्ग शोधले जात आहेत. इतर दुसऱ्या योजनाही यामुळे धोक्यात आल्या आहेत. कृषी मंत्री यांनी ३१ मार्च पर्यंत शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम देऊ असे म्हटले होते. मात्र सरकारने त्यांच्याकडील पैशाचा हिस्सा विमा कंपन्यांना दिला नसल्याचे कंपन्यांचे म्हणणे आहे. यावर सरकार काहीच बोलत नाही. आश्वासन द्यायचे आणि सोयी प्रमाणे ते विसरून जायचे काम सरकार करीत असल्याचे शेट्टी म्हणाले. आता जर येत्या पंधरा दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यावर पीक विम्याचे पैसे जमा झाले नाही, तर मुंबईतील कार्पोरेट कंपन्यांच्या कार्यालयामध्ये घुसून पैसा वसूल करू, असा इशारा राजू शेट्टी यांना सरकारला दिला आहे.

### अंजली दमानिया थेट

करण्याचा डाव होता, असे म्हटले होते. त्यामुळे, संतोष देशमुख प्रकरणावरुन या भेटीला वेगळं महत्व आहे. मात्र, दोन-तीन दिवसांपूर्वी एका सभेमध्ये दादांना चक्कर आली होती, त्यावेळी मी ठरले होते की आपण भेट घेऊन दादांच्या तब्येतीची विचारपूस करावी. त्यामुळे, आज भेट घेऊन मनोज दादांची विचारपूस केल्याचे अंजली दमानिया यांनी भेटीनंतर स्पष्ट केले.

आम्ही आतापर्यंत कधीही भेटलो नव्हतो, फक्त फोनवर चर्चा झाली होती. म्हणून मी आज ठरवून भेटू घेतली, सगळ्यात चांगल्या माणसांना भेटायला कधीच काही प्रॉब्लेम नसतो, असेही दमानिया यांनी या भेटीनंतर बोलताना म्हटले. दमानिया ह्या आज जालना दौऱ्यावर असून त्यांनी अंतरवाली सराटीत जाऊन मनोज जरांगे यांची भेट घेतली. तर, या अगोदरच या ठिकाणी सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हेदेखील उपस्थित होते. या भेटीत मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणावर चर्चा झाल्याची माहिती आहे.

संतोष देशमुख खून प्रकरणाबाबत काही चर्चा झाली का, असा प्रश्न विचारला असता, याला पुढची दिशा कशी द्यायची यावर चर्चा झाली. मला त्या चार्टशीटमध्ये सगळंच्या सगळं अर्धवट वाटत आहे. आरोपी सुदर्शन घुलेच स्टेटमेंट जेव्हा माध्यमांसमोर आले, मला ते पूर्णपणे अर्धवट वाटले. कारण, त्यात खुनानंतर पुढे काय झाले, तो कुठे गेला, कोणाच्या मदतीने बाहेर राहिला, तेव्हा कराडशी त्याचे बोलणे झाले की नाही याबाबत चकार शब्द सुद्धा स्टेटमेंटमध्ये लिहिलेले नाही, असे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

### पंकजाताई मुंडेंचा परळीत

गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांनी जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण केले. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुण्याईचा वसा अन्? वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा देणारी ही गर्दी होती. सत्तेतील मंत्रीपदाचा वापर तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असं त्या यावेळी म्हणाल्या.

### पुरस्काराचे एक लाख

घरी घेऊन न जाता ती दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या कु. वैभवी देशमुख हिच्या शिक्षणासाठी देणार असल्याची घोषणा ओमप्रकाश शेटे यांनी केली. त्यांच्या या सामाजिक दायित्वाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे. दैनिक लोकाशा वर्तमानपत्राच्या वतीने आरोग्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा राज्यस्तरीय लोकाशा भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला. पुरस्कारार्थींना शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह सोबतच एक लाख रुपयांचा धनादेश संयोजकाच्या वतीने देण्यात आला. पुरस्कारासोबत मिळालेला एक लाख रुपयांचा निधी घरी घेऊन न जाता, तो आपण दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांची कन्या कु. वैभवी देशमुख हिच्या शिक्षणासाठी देणार असल्याची घोषणा डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी केली. यावेळी टाळ्यांचा प्रेक्षकांमधून कडकडाट झाला.सगळीकडे जातीधर्माचे स्तोम माजले असून सामाजिक वातावरण दुषित झाले आहे. मात्र अशा परिस्थितीत डॉ.शेटे यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे मानवतेचा दृष्टिकोन मजबूत होऊन सामाजिक सलोखा राखला जाण्यास मदत होणार आहे. काही घटनांमुळे जिल्ह्याची प्रतिमा कमीजास्त प्रमाणात डागाळण्याचे काम झाले आहे. मात्र बीड जिल्हा गुणवंतांची खाण असून लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे, स्व.प्रमोद महाजन, स्व.खा. केशरकाकु क्षीरसागर, स्व.विनायकराव मेटे यांच्यासारख्या महान विभूतींना घडवणारा हाच बीड जिल्हा असल्याचे डॉ.शेटे यांनी आपल्या भाषणात ठणकावून सांगितले. तसेच जिल्ह्याचा नावलौकिक व प्रतिमा उंचावण्यासाठी आपण खारीचा वाटा उचलणार असल्याचेही ते म्हणाले.

### आ.संदीप क्षीरसागरांच्या दूरदर्शी

या पूल कम कोल्हापुरी पद्धतीच्या बंधार्यामुळे बीड शहर आणि परिसरातील आसपासच्या गावांमध्ये भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. ही आनंदाची बाब आहे.

बीड शहरातील बार्शी नाक्याजवळील असलेल्या बिंदुसरा नदी पात्रात पूल कम कोल्हापूरी बंधारा

तयार करावा. जेणेकरून बिंदुसरा नदीतून वाहून जाणारे पाणी अडविले जाईल. हे काम करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी गेल्या अनेक वर्षांपासून हा विषय लावून धरला. अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. या कामाच्या मंजूरीसाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी अनेक वर्षे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. आणि अखेर आ.संदीप क्षीरसागरांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आहे. बिंदुसरा नदीवरील बंधार्यामुळे बीड परिसरात सिंचन आणि पाणी उपलब्धतेसाठी मोठा फायदा होणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतून बीडसाठी अतिशय फायदेशीर असलेले हे काम लवकरच पूर्ण होणार आहे.

पूल कम बंधार्याचा सिंचन आणि पाणी साठवण्यासाठी मोठा फायदा

शुभारंभ झालेल्या बिंदुसरा नदीवरील पूल कम कोल्हापूरी बंधार्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या साधारण ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरात भूजल पातळीत वाढ होणार आहे. बीड जिल्ह्यात पावसाची अनियमितता असल्याने प्रत्येक उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होते. परंतु या कोल्हापूरी बंधार्यामुळे पाणी साठवणूक होईल. परिणामी पाणी उपलब्धता आणि शेती सिंचनासाठी याचा खूप मोठा फायदा या पूल कम बंधार्याचा होणार आहे. बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल ही संकल्पना मोठी दूरदर्शी होती. ती आ.संदीप क्षीरसागर यांनी डोळ्यासमोर ठेवून हे काम होण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अनेकवेळा अधिवेशनातही हा मुद्दा मांडला. दरम्यान आता आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश आले असून लवकरच हे काम पूर्ण झालेले असेल.

## पान ६ वरून...

### बीड जिल्हा बँकेचे पालकत्व

आहेत. कित्येक ग्राहकांनी या आर्थिक विवंचनेतून आत्महत्या देखील केल्याचे मोदी यांनी अजितदादा यांना अवगत केले.

गेली काही काळापासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक परिस्थिती मुळे बँकेचे ठेवीदार, शेतकरी, छोटे व्यापारी, नोकरदार, निवृत्त कर्मचाऱ्यांचे कोट्यावधी रुपये या बँकेत अडकले आहेत. त्यामुळे त्यांचा आर्थिक व्यवहार देखील ठप्प झाल्याने येथील ग्राहकांच्या कुटुंबांवर देखील याचा विपरित असा परिणाम झाला आहे. यामुळेच पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने या बँकेचे पालकत्व स्विकारुन ही बँक आर्थिक तोट्यातून बाहेर काढावी. जेणेकरून त्याचा फायदा जिल्ह्यातील लाखो ग्राहक तसेच शेतकऱ्यांना होणार असल्याचे राजकीशोर मोदी म्हणाले. राजकिशोर मोदी यांनी बँकेविषयी केलेल्या मागणीवर गांभीर्याने विचार करू तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे (शिखर बँक) अधिकारी या बँकेत पाठवून बँकेस आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करू असा सकारात्मक प्रतिसाद उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी दिल्याचे मोदी यांनी यावेळी सांगीतले.

### चौसाळा येथे चावडी

दरम्यान इ फेर फार प्रणालीत नोंद घेऊन विहित कार्यपद्धतीचा अवलंबन करून मंडळ अधिकाऱ्यामार्फत खातेदारांचे वारसाची नोंद घेऊन सर्व जिवंत व्यक्ती सातबारावर येतील हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे चौसाळा व धोत्रा येथील सर्व शेतकरी खातेदारांनी या मोहिमेत सक्रिय सहभागी होऊन आपले शेती दस्तावेज सातबारा अद्यावत करण्याचे आव्हान ग्राम महसूल अधिकारी(तलाठी) कमलेश निर्मळ यांनी केले आहे

### अध्यक्षपदी सचिन जावळे

वैभव जावळे योगेश गालफाडे यांची निवड करण्यात आली आहे.

या सोहळ्याचं मुख्य आकर्षण म्हणजे मिरवणुक प्रमुख म्हणुन नितीन साळवे धम्मा गावडे आनंद साळवे विशाल गणकवार संतोष कांबळे भैय्या शिनगारे सन्नी टाकणखार युवराज साळवे विजय सुतार सागर टाकणखार लखन फुलवरे गोटू लांडगे आदित्य टाकणखार सुरेश तूपसौदर भैय्या भिसे कृष्णा साळवे गोल्डी जावळे अनिकेत घोडके आकाश गालफाडे आदिंच योगदान लाभणार आहे प्रसंगी या बैठकीस नगरातील जेष्ठ नागरीक महिला भगिनीसह युवा बांधव उपस्थित होते.

### स्थानिक स्वराज्य

जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि. ३ एप्रिल २०२५ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान माळीवेस चौक येथील हनुमान मंदिर सभागृहात शिवसेनेच्या बीड जिल्ह्यातील महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित संपन्न झाली. या बैठकीत मागील सदस्य नोंदणीचा आढावा घेण्यात आला. तसेच नवीन सदस्य नोंदणीचा शुभारंभ शिवसेना, महिला आघाडी, युवासेना शेतकरीसेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती-जमाती सेनेचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शाखाप्रमुख व उपस्थित शिवसैनिकांच्या शुभहस्ते करण्यात आला. आपल्या शिवसेना पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी एकनाथजी शिंदे साहेब यांची बीड जिल्ह्यातून ताकद वाढविण्यासाठी तर यंदाच्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी बीड जिल्ह्यातून सर्वाधिक शिवसेना सदस्य नोंदणी फॉर्म भरण्याची जिम्मेदारी आपल्या सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शाखाप्रमुख व शिवसैनिकांच्या खांद्यावर असून आपण सर्व प्राधान्याने पुढाकार घेऊन सदस्य नोंदणीच्या अभियानात आपले सर्वोपरी योगदान द्यावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक यांनी आपल्या भाषणात केले. या बैठकीचे सूत्रसंचलन प्रतिक कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवसेना उप जिल्हाप्रमुख संतोष जाधव यांनी केले.

### शाळा गुणवत्ता मूल्यांकन व

शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी, उपशिक्षणाधिकारी मैना बोराडे, भगवान सोनवणे, रंगनाथ राऊत, मोहन काकडे ,नानाभाऊ हजारे ,तुकाराम पवार व प्रोग्रामर सुरेंद्र रणदिवे उपस्थित होते.

पुढे बोलताना उपसंचालक यांनी शंभर दिवसांमधील सात उपक्रम यामध्ये कार्यालयाची वेबसाईट तयार करणे, इज ऑफ लिविंग संकल्पना, शासकीय कार्यालयातील वेबसाईट अद्यावत करणे, शासकीय कार्यालयातील स्वच्छता, नागरिकांच्या तक्रारी ,व प्रलंबित प्रकरने निकाली काढणे, शासनाच्या महत्त्वाच्या प्रकल्पांना भेटी देणे व शासकीय काम करताना कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

प्रारंभी शिक्षणाधिकारी माध्यमिक नागनाथ शिंदे यांनी स्वयमूल्यमापन, निपुण महाराष्ट्र, अपार आय डी,आधार इत्यादी बाबतचा तालुका निहाय आढावा गटशिक्षणाधिकारी व केंद्रप्रमुख यांच्याकडून घेतला. तर प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी येत्या दोन दिवसात शंभर टक्के काम पूर्ण करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आभार प्रदर्शन रघुनाथ राऊत यांनी केले. यावेळी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी, सर्व केंद्रप्रमुख, सर्व विस्तार अधिकारी, व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.

### महसूल विभागाचा

## पान ६ वरून...

( मृत्यू दाखला , वारसाबाबत सत्यप्रतिज्ञालेख , स्वयंघोषणापत्र /पोलीसपाटील / सरपंच / ग्रामसेवक यांचा दाखला , सर्व वारसांचे नावे , वय , पत्ते व मोबाईल नंबर तसेच रहिवासी बाबतचा पुरावा ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांच्याकडे सादर करावयाचे आहेत . ग्राम महसूल अधिकारी योग्य ती चौकशी करून मंडळ अधिकाऱ्यांमार्फत वारस ठराव करण्यात येईल . त्यानंतर दिनांक २१ एप्रिल २०२५ ते १० मे २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांच्याकडून ई फेरफार प्रणालीमध्ये ऑनलाईन वारस फेरफार तयार करून महसूल अधिनियम १९६६ च्या विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून मंडळ अधिकारी यांच्या मार्फत वारस फेरफारावर निर्णय घेऊन

त्यानुसार सातबारा दुरुस्त करण्यात येईल . जेणेकरून सर्व जिवंत व्यक्ती सातबारावर नोंदविल्या जातील. सातबारा उताऱ्यावर मयत शेतकऱ्यांचे नाव असल्यामुळे अनुदानाची केवायसी करणे व इतर कामांमध्ये अडचण येताना दिसत होती . या मोहिमेमुळे प्रत्येक वारसदारांना शासनामार्फत मिळणाऱ्या प्रत्येक योजनेचा लाभ मिळणे सोपे होणार आहे . त्याकरिता महसूल प्रशासन नेहमीच सज्ज आहे . येणाऱ्या काही दिवसात आपला सातबारा जिवंत होईल हे नक्कीच !

बीड तालुक्यामध्ये एकूण २३६ गावे , १६ मंडळे , ८८ सज्जे असे एकूण १२०६९० शेतकरी खातेदार आहेत . यातील मयत खातेदार यांची यादी बनवून सर्वांपर्यंत या योजनेची माहिती पोहोचवण्यासाठी बीड तालुक्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी धडाडीने प्रयत्न सुरु केले आहेत . गावोगावी जाऊन प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत योजनेची माहिती देण्यासाठी सर्व नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी यांचे प्रयत्न सुरु असणार आहेत . ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांनी १ एप्रिल पासूनच ८ अ उताऱ्याचे चावडी वाचन सुरु केलेले आहे .जिवंत सातबारा मोहिमेसाठी शासनाने तहसीलदार यांची त्यांच्या तालुक्यासाठी समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक केली आहे . तर संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे जिल्ह्याचे नियंत्रण अधिकारी म्हणून निवड केलेली आहे . याशिवाय संबंधित विभागीय आयुक्त त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यांसाठी विभागीय संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत . आयुक्त जिल्ह्यांचा नियमित आढावा घेऊन त्याबाबतचा साप्ताहिक अहवाल शासनाला सादर करणार आहेत.जिवंत सातबारा ही मोहीम सर्व शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त अशी मोहीम आहे . त्यामुळे मयतांची नावे सातबारा वरून कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी सुद्धा प्रतिसाद द्यावा , असे आवाहन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे .

### ईद-उल-फित्र निमित्ताने

रमजान ईदला अतिशय महत्त्वाचे व पवित्र असे स्थान आहे. या ईदच्या दिवशी सकाळी प्रत्येक मुस्लिम बांधव शहरातील विविध ठिकाणी असलेल्या ईदगाह मैदान , मस्जिद मध्ये जाऊन नमाज पठण करण्यात आले. राजकिशोर मोदी हे गेली अनेक वर्षांपासून मस्जिद तथा ईदगाह मैदानावर जाऊन त्यांना शुभेच्छा देतात . तीच परंपरा यावर्षी देखील जोपासत शहरातील मर्कस मस्जिद तसेच ईदगाह मैदानावर जाऊन रमजान ईद निमित्त उपस्थित सर्व मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्या. शहरातील सर्व हिंदू मुस्लिम बांधवांच्या आयुष्यात सुख समृद्धी सोबतच उत्तम आरोग्य लाभो अशी भावना व्यक्त करताना समाजात स्वातंत्र्य समता , बंधुभाव तसेच समाजा समाजात एकतेची भावना नांदो अशी अपेक्षा व्यक्त केली. ईदगाह मैदानात जाऊन मुस्लिम बांधवाना शुभेच्छा दिल्यानंतर राजकिशोर मोदी व त्यांचे सहकारी अंबाजोगाई शहरातील अनेक मुस्लिम बांधवांच्या घरी जाऊन त्यांना शुभेच्छा देत तेथे शिरखुर्माचा आस्वाद घेतला. मुस्लिम बांधवानी देखील राजकिशोर मोदी यांचे आपल्या घरी उत्स्फूर्त असे स्वागत करत त्यांच्याकडून सर्वधर्म समभाव तसेच हिंदू मुस्लिम ऐक्य अबाधित राखण्यासाठी केला जाणारा प्रयत्न हा वाखाणण्याजोगा असल्याचे समाजाकडून बोलताना आढळून आले.

### जनसुरक्षा विधेयक रद्द करुन शेतकऱ्यांचे

आमच्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत. १) सोमनाथ सुर्यवंशी यांची हत्या करणाऱ्या संबंधित पोलीसांवर ३०२ चा गुन्हा नोंद करावा., २) जनसुरक्षा अधिनियम हे विधेयक रद्द करावे, ३) बिहार येथील महाबोधी विहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे. १९४९ चा कायदा रद्द करावा., ४) शेतकरी बांधवांचे कर्ज सरसकट माफ करावे., ५) एस.सी., एस.टी. देशात घडलेल्या घटनेतील पिडीत परिवारांचे शासनाने तात्काळ पुनर्वसन करावे आणि ६) नागपूर येथील मुस्लिम बांधवांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्या आरोपीवर कठोर कार्यवाही करण्यात यावी. तेथील मुस्लिम बांधवांचे झालेले नुकसान भरपाई करण्यात यावी. सदरील मागण्यां १० दिवसांमध्ये मान्य नाही झाल्या तर आम्ही संघटनेच्या वतीने जेलभरो आंदोलन करू, याची जबाबदारी शासन प्रशासनावर राहील. निवेदनावर निवेदक भिमराव सरवदे (बीड जिल्हा कार्याध्यक्ष, भिमशक्ती), धीमंत राष्ट्रपाल (बीड जिल्हा संघटक, भिमशक्ती), राजेश वाहुळे (मराठवाडा प्रदेशाध्यक्ष, लोक जनशक्ती पार्टी युवा (र), सुमित आवाडे (अंबाजोगाई तालुकाध्यक्ष, भीमशक्ती) यांच्यासह रत्नदीप सरवदे, आकाश देशमुख, अविनाश उगले, हरिभाऊ सरवदे, अविनाश पाडुळे, संभाजी घोरपडे, लालू शेख, चंद्रकांत यादव, कैलास पाडुळे, गौतम सरवदे, गोविंदराव बापू कदम, परमेश्वर सरवदे, अविनाश पन्हाळे, इलाई शेख आदींसह पंचक्रोशीतील गांवकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शुक्रवार दि.४ एप्रिल २०२५



## पाटोदा तालुक्यात महसूलच्या जिवंत सातबारा मोहिमेस आरंभ

पाटोदा। प्रतिनिधी


वडिलोपार्जित जमिनीचा सातबारा. वर महसूल अभिलेखात वारसाची नोंद न झाल्याने वारसांना अडचणीचा सामना करावा लागतो यावर उपाययोजना म्हणून शासनाने जिवंत सातबारा मोहीम राबवण्याचे निर्देश दिले आहेत त्यानुसार पाटोदा तालुक्यातील सर्व महसूल मंडळामध्ये मंगळवार दिनांक १ एप्रिल रोजी मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला आहे ही मोहीम १०० दिवस चालणार आहे अशी माहिती तहसीलदार दत्तात्रय निलवाडे यांनी दिली आहे राज्याच्या महसूल विभागाने बुलढाणा जिल्ह्यातील सर्व गावांमधून मंगळवारी या जिवंत सातबारा मोहिमेस सुरुवात केली आहे त्यानुसार राज्यातील सर्वच गावांमध्ये मोहिमा राबवण्याचे निर्देश महसूल मंत्री चंद्रकांत बावनकुळे यांनी दिली आहे.

जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत सातबारे वरील सर्व मयत खातेदाराच्या वारसांच्या नोंदी घेण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे पाटोदा तालुक्यातील पाटोदा सह अमळनेर दासखेड थेरला महसूल मंडळात या मोहिमेला सुरुवात झाली असून तलाठी मंडळ अधिकारी या मोहिमांतर्गत गावात चावडी वाचनावर या मोहिमेची माहिती शेतकऱ्यांना देत आहेत आवश्यक ती कागदपत्रे वेळेत दिल्यास या मोहिमेद्वारे वारसांची सातबारे व नाव घेणे सोपे जाणार आहे शेतकऱ्यांनी या मोहिमेचा लाभ घेण्याचे आव्हान तहसीलदार नेलवाड यांनी केले आहे

# तुळजाभवानी अर्बनची आर्थिक भरारी: व्यवसाय १००८.६८ कोटींवर, नफा १८.३० कोटी!

माजलगाव। प्रतिनिधी

दिनांक ३ एप्रिल २०२५: तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव यांनी मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात अत्यंत संतोषजनक आर्थिक प्रगती साधली आहे. संस्थेने एकूण व्यवसायात १००८.६८ कोटी रुपये हा महत्त्वाचा टप्पा गाठला असून, यामुळे संस्थेच्या भक्कम आर्थिक व्यवस्थापनाची आणि ग्राहक विश्वासाची साक्ष मिळते. या आर्थिक वर्षात संस्थेने ठेवी, कर्ज वितरण, गुंतवणूक आणि नफा यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



आर्थिक कामगिरीचा आढावा: तुळजाभवानी अर्बनने मार्च २०२५ अखेरच्या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे प्रमुख आर्थिक निर्देशांकांमध्ये यश मिळवले आहे: एकूण व्यवसाय: १००८.६८ कोटी रुपये संस्थेने १००० कोटींहून अधिक व्यवसायाचा टप्पा गाठला आहे, जो को-ऑपरेटिव्ह क्षेत्रातील संस्थेसाठी एक उल्लेखनीय यश आहे. यात ठेवी आणि कर्ज वितरणाचा समावेश आहे, ज्यामुळे संस्थेचा विस्तार आणि ग्राहक आधाराची मजबुती दिसून येते.

ठेवी: ६०१.१२ कोटी रुपये ग्राहकांचा संस्थेवर असलेला विश्वास ठेवींच्या वाढीतून दिसून येतो. ६०१.१२ कोटींच्या ठेवी संस्थेला कर्ज वितरण आणि गुंतवणुकीसाठी भक्कम भांडवल उपलब्ध करून देतात. स्वनिधी: ७१.६१ कोटी रुपये संस्थेचा स्वनिधी ७१.६१ कोटी रुपये असून, हा आकडा संस्थेच्या आर्थिक स्थिरतेचे आणि भविष्यातील विस्तारासाठीच्या सक्षमतेचे द्योतक आहे. कर्ज वितरण: ४०७.५६ कोटी रुपये संस्थेने ४०७.५६ कोटींचे कर्ज वितरित केले आहे, हे प्रमाण कर्ज वितरण आणि जोखीम व्यवस्थापन यांचा समतोल राखण्यात संस्थेच्या यशाचे द्योतक आहे. गुंतवणूक: २४०.४६ कोटी रुपये संस्थेने २४०.४६ कोटींची गुंतवणूक केली आहे, जी ठेवींपैकी ४०% आहे. या गुंतवणुकीमुळे संस्थेला स्थिर उत्पन्न मिळते आणि आर्थिक जोखीम कमी होते. नफा: १८.३० कोटी रुपये १८.३० कोटींचा निव्वळ नफा हा संस्थेच्या कार्यक्षमतेचा आणि चांगल्या आर्थिक व्यवस्थापनाचा पुरावा आहे. हा नफा स्वनिधी वाढवण्यासाठी आणि सभासदांना लाभांश देण्यासाठी वापरला जात असतो. सोनतारण व ठेवीतून कर्ज: १३३.३३ कोटी रुपये सोनतारण (गोल्ड लोन) आणि ठेवींवर आधारित कर्जाची मागणी वाढत असून, संस्थेने या क्षेत्रात १३३.३३ कोटींचे कर्ज वितरित केले आहे. यामुळे ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण होत आहेत. तुळजाभवानी अर्बनने आपल्या आर्थिक प्रगतीसाठी ग्राहककेंद्रित दृष्टिकोन, पारदर्शक व्यवस्थापन आणि जोखीम व्यवस्थापनावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. ठेवी आणि कर्ज वितरण यांचा समतोल राखताना संस्थेने गुंतवणुकीतून स्थिर उत्पन्न मिळवले आहे तसेच यामुळे तरलता प्रमाण राखण्यास मदत होते. विशेषतः, सोनतारण कर्जाची वाढती मागणी आणि ग्राहकांचा विश्वास यामुळे संस्थेला आपला व्यवसाय विस्तारण्यात यश मिळाले आहे.

भविष्यातील योजना: संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ म्हणाले, ''आम्ही आमच्या सभासदांचा आणि ग्राहकांचा विश्वास जपत आहोत. मार्च २०२५ अखेर १००८.६८ कोटींचा व्यवसाय हा आमच्या प्रगतीचा पुरावा आहे. भविष्यात आम्ही कर्ज वितरण वाढवण्यावर, डिजिटल बँकिंग सेवांचा विस्तार करण्यावर आणि सभासदांसाठी नवीन योजना आणण्यावर लक्ष केंद्रित करणार आहोत.''संस्था पुढील काही वर्षांत खालील क्षेत्रांवर विशेष लक्ष देणार आहे:डिजिटल बँकिंग सेवांचा विस्तार, जसे की ऑनलाइन कर्ज अर्ज प्रक्रिया. सभासदांसाठी आर्थिक साक्षरता कार्यक्रम राबवणे, ज्यामुळे ठेवी आणि कर्ज मागणी वाढेल.संस्थेने आपल्या सभासद आणि ग्राहकांना आवाहन केले आहे की, ''सर्व ग्राहक, ठेवीदार, सभासद, ठेवीदार, कर्जदार, शुभचिंतक आणि मित्र परिवाराने कोटी कोटी धन्यवाद! आपल्या विश्वासाने, प्रगतीच्या दिशेने!'' संस्था आपल्या सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी कटिबद्ध आहे.

## महाबौध्दी विहाराच्या मुक्तीसाठी वडवणी ते बीड पायी लाँग मार्च

### हजारोंच्या संख्येने सामील व्हा-बाबासाहेब साळवे

वडवणी । प्रतिनिधी

बौद्धगया येथील महाबौध्दी महाविहार बोद्ध धर्मीयांच्या ताब्यात द्या. या मागणीसाठी वडवणी ते बीड पायी लाँग मार्चचे आयोजन नागवंशी बुध्द विहार वडवणीचे संस्थापक बाबासाहेब साळवे, व ईत्तर सामाजिक संघटना यांच्या वतीने दि.४ मार्च २०२५ रोजी करण्यात आले आहे. तरी या लाँग मार्च मध्ये हाजारोंच्या संख्येने सामील व्हा, असे आव्हान वडवणी तालुक्यातील जनतेला नागवंशी बुध्द विहाराचे संस्थापक बाबासाहेब साळवे यांनी केले आहे.



संबंध भारत देशामध्ये गेल्या अनेक दिवसापासून,बौद्धगया येथील महाबौध्दी महाविहार, हे बौद्धांच्या ताब्यात द्यावं. या मागणीसाठी आंदोलने, धरणे, मोर्चे, हे चालू असून या आंदोलनाची गती आणखी तीव्र होत चालली आहे. बिहार राज्यातील बौद्धगया या ठिकाणी असलेले महाबौध्दी महाविहार, हे बौद्ध धर्मीयांच्या अस्मितेचा स्वाभिमानाचा, व सांस्कृतिचा प्रश्न आहे. हे महाविहार १९४९ ईंग्रज कालीन कलमा अंतर्गत ब्राह्मणांच्या ताब्यात असून, या ठिकाणी विविध अंधश्रद्धेचे प्रकार सुरू असून, हे कदापिही बौद्ध धर्मीयांना मान्य नाही. या अनुषंगाने हे आंदोलन संपूर्ण भारत देशामध्ये उभे राहिले आहे. जसे ख्रिश्चन धर्मियांचे चर्च हे ख्रिश्चनांच्या ताब्यात आहे. मुस्लिमांची मज्जित मुस्लिमांच्या ताब्यात आहे. हिंदूंचे मंदिर हिंदूंच्या ताब्यात आहेत. त्याचप्रमाणे बौद्ध धर्मीयांची अस्मिता असलेले हे बौद्ध विहार बौद्ध धर्मीयांच्या व भंतिजींच्या ताब्यात देण्यात यावे. या मागणीसाठी संपूर्ण भारतामध्ये आता जोर वाढला असून, संपूर्ण भारतभर आंदोलन मोर्चे धरणे मोठ्या प्रमाणात केले जात आहेत. त्याच अनुषंगाने वडवणी या ठिकाणी नागवंशी बौद्ध विहार वडवणी, चे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब साळवे,व इतर सहकारी यांच्या वतीने वडवणी ते बीड पायी लाँग मार्चचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या पायी लाँग मार्च मध्ये वडवणी तालुक्यातील जनतेने, मोठ्या संख्येने सामील व्हावे असे आव्हान आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. दिनांक ४ मार्च २०२५ रोजी हा पायी लाँग मार्च वडवणी येथील बाबासाहेब आंबेडकर चौकाला अभिवादन करुन, सुरुवात करण्यात येणार आहे. तर याचा शेवट बीड जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी मागण्यांचे निवेदन देऊन करण्यात येणार आहे.

## आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची १०४६ वी जयंती उत्साहात साजरी



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची १०४६ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. हा भव्य सोहळा श्री रामलिंग चौंडेश्वरी व नवनाथ महाराज मंदिर (गढीवर), कोष्टी गल्ली, अंबाजोगाई येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माता चौंडेश्वरी देवी व आद्य वचनकार लिंगायत हटगर कोष्टी समाज कुलगुरू श्री श्री श्री देवरदासी मैया यांची सौ. सीमा प्रदीप वरवटकर महिलाअध्यक्ष महाराष्ट्र राज्य लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था महाराष्ट्र राज्य, शाखा अंबाजोगाई यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले. या पावन सोहळ्यात समाजातील असंख्य बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या श्रद्धेचा आणि एकात्मतेचा ठेवा जपला. विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून श्री देवरदासी मैया यांच्या विचारांचा आणि शिकवणीचा महिमा उलगडण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांनी समाज एकता, आध्यात्मिक विचारधारा आणि संस्कृतीच्या जतनाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला. जयंती उत्सवाने समाजामध्ये नवचैतन्य निर्माण करत, भक्तिभाव आणि प्रेरणादायी विचारांची जागृती घडवली.

यावेळी सिमा शेंगोळे,मीराताई मसनाळे,रूक्मिणबाई रूघे, संजीवनी शेंगोळे,...अरूणा हरदास,अंजली उमराणे,किशोरी शेंगोळे,श्रद्धा मसनाळे यांच्यासह अंबाजोगाई लिंगायत हडगार कोष्टी समाज संस्था शाखा अंबाजोगाई चे अध्यक्ष नरसिंह कानडे,शुभंम मसनाळे,गणेश कानडे,राजेंद्र हाट्टे,विलास द्रुकर,संतराम घोळक, नारायण कानडे विष्णु मसनाळे,दिवाकर मसनाळे हनुमंतराव चौधरी ,सुनिल शेंगोळे देवराव हरदास तसेच अंबाजोगाई कोष्टी समाज अध्यक्ष नारायण हरेगावकर,महाराष्ट राज्य लिंगायत हडगार कोष्टी संस्था संचालक प्रविण उमराणे हे उपस्थित होते या कार्यक्रमास राष्ट्रीय अध्यक्ष श्री किशोर गिरवलकर यांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमाचे नियोजन लिंगायत हटगर कोष्टी समाज संस्था शाखा अंबाजोगाई यांनी केले होते, या कार्यक्रमास समाज बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नांदेवली गावात घुमू लागला 'विठ्ठल नामाचा' जयघोष

### संत-महंत,भाविकांच्या उपस्थितीने गावाला आले गोकुळाचे स्वरूप

शिरूर। प्रतिनिधी

श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथगडाचा ४७ वा नारळी सप्ताह शिरूर तालुक्यातील मौजे नांदेवली गावामध्ये महंत जनार्दन महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली बुधवार दि. २ एप्रिल पासून आरंभीत करण्यात आला आहे. बुधवारी पुष्पवृष्टीचा कार्यक्रम असल्याने पंचक्रोशीतून भाविक भक्तांची मांदियाळी पाहायला मिळाली. नांदेवली गावामध्ये सप्ताहाच्या निमित्ताने अगदी पहिल्या दिवसापासूनच संत-महंतांसह लाभत असल्याने व अखंड विठ्ठल नामाच्या जयघोषाने नांदेवली गावाला मोठे गोकुळाचे स्वरूप आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

वै. महंत स्वामी निगमानंद महाराज यांच्या प्रेरनेतून सुमारे ४७ वर्षांपूर्वी आरंभीत करण्यात आलेला श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथगडाचा फिरता नारळी सप्ताह आज वटवृक्ष होऊन भाविक-भक्तांना भर उन्हाळ्यात अध्यात्माचा गारवा देऊ लागला आहे.या वर्षीचा हा फिरता नारळी सप्ताह शिरूर



तालुक्यातील मौजे नांदेवलीत (बाबांच्या जन्मभूमीत) आयोजित करण्यात आला असून बुधवार दि. २ एप्रिल रोजी या सप्ताह आरंभाची पुष्पवृष्टी महंत जनार्दन महाराज, महंत रामेश्वर महाराज शास्त्री, महंत उद्धव महाराज शास्त्री,चैतन्य महाराज शास्त्री,यशवंत महाराज मसने,तीर्थराज महाराज पठाडे, संभाजी महाराज खेडकर, महेश महाराज शास्त्री, भास्कर देवा मुळे, नंदकिशोर महाराज चव्हाण, आदी संत-महंतांच्या उपस्थिच्या शुभ हस्ते ब्रह्मवृंद्धाच्या मंत्र उचारात करण्यात आली आहे. या कार्यक्रमानंतर या ठिकाणी आयोजित केलेले धार्मिक सुरू करण्यात आले आहेत. रात्रीचे हभप. विशाल महाराज खोले यांचे कीर्तन असल्याने हजारो भाविक-भक्त या ठिकाणी भाजी भाकरीचा आस्वाद घेऊन किर्तन श्रवणासाठी मुक्कामी होते. सप्ताह दरम्यान पंचक्रोशीतील अनेक संत -महंत, कथाकार, कीर्तनकार, गायक,वादक, याचबरोबर धार्मिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर या सप्ताह भेटीगाठी देणार आहे. या सप्ताह मध्ये आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाच्या अध्यात्मिक ज्ञानमृत घेण्यासाठी येण्यासाठी पुढील आठ दिवस हजारोच्या संख्ये भाविक उपस्थित राहणार असल्याने व कथा कीर्तन भजन याच्या माध्यमातून अखंड विठ्ठल नामाचा जय घोष चालणार आहे. नांदेवली गावामध्ये अगदी पहिल्या दिवसापासूनच मांदियाळी लाभल्याने या गावाला गोकुळाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचा नारळी सप्ताह हा या वर्षी गुरुदेवांच्या जन्मभूमीत असल्याने या कार्यक्रमाला खास महत्व प्राप्त झाले आहे. हा सप्ताह म्हणजे भाविकांसाठी पुण्यफलीत राशी आहे. म्हणून भाविकांनी या सप्ताहचा भक्ती भावाने घेऊन सप्ताह सोहळ्याला वृद्धिंगत करण्यासाठी आपला हातभार लावावा असे आवाहन श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांनी केले आहे.

## अपघाती विमा म्हणजे कुटुंबाला आधार-राकेश शाही

आष्टी । प्रतिनिधी

कोणत्याही बॅकेंत खाते असु द्या पण प्रत्येकाने अपघाती विमा घेतलाच पाहिजे,या विम्याचे कुटुंबातील मयत झालेली व्यक्ती परत येणार नाही.पण विमा काढल्यानंतर कुटुंबाला जी मदत मिळेल तो कुटुंबांसाठी आधार असेल असे प्रतिपादन भारतीय स्टेट बॅकेचे शाखा प्रबंधक राकेश शाही यांनी केले आहे.

आष्टी येथील खडकत रोडवरील भारतीय स्टेट बॅक शाखा आष्टीचे खातेदार ज्ञानेश्वर आनंदा आटपाळे,रा. आंबेवाडी या.आष्टी,जि.बीड यांचा तीन महिन्यापुर्वी अपघाती मृत्यू झाला होता.परंतु भारतीय स्टेट बॅकेंत त्यांनी केंद्र सरकारने २० रूपायांत सुरक्षा विमा योजना,४३६ रुपायांत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना तर भारतीय स्टेट बॅंकेने एक हजार रूपायात २०



लाखांचा विमा घेतला होता.त्यानुसार त्यांना ३१ मार्च रोजी २० रुपायात २ लाखांचा विमा मंजूर झाला.आणि बाकी दोन विमे ही जमा होतील.आज गुरुवार (दि.३)रोजी आटपाळे यांचे वारसदार पत्नीला दोन लाखांचा धनादेश देण्यात आला.यावेळी राकेश शाही बोलत होते.यावेळी शाखेचे उप प्रबंधक शिवनाथ राऊत म्हणाले,ज्यावेळेस खातेदार बॅकेंत येतो त्यावेळस बॅकेंतील कर्मचारी त्यांना विमा घेण्याबाबत माहिती देतात पण खातेदारांची मानसिकता वेगळीच असते जर असा वाईट प्रसंग एखाद्यावर आला तर त्या योजनेचे महत्व त्या कुटुंबातील व्यक्तींना विचारा हा आधार किती मोठा असतो.त्यासाठी भारतीय स्टेट बॅंकेच्या कोणत्याही शाखेत खाते असले तर वय वर्ष १८ ते ६५ पर्यंतच्या खातेदारांनी केंद्र सरकारने २० रूपायांत सुरक्षा विमा योजना,४३६ रुपायांत प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना तर भारतीय स्टेट बॅंकेने एक हजार रूपायात २० लाखांचा विमा तर दोन हजार रुपायात ४० लाखांचा विमा आहे.

# शेख निजामच्या मागे राष्ट्रवादी पूर्णपणे पाठीशी राहील-अजित पवार

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील व शहरातील प्रगल्भ आणि अचूक राजकीय निर्णय घेण्याची क्षमता असलेल्या शेख निजाम यांनी शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधण्याचा निर्णय घेतला व त्यानिमित्ताने शेख निजाम यांचा पक्षप्रवेश व रमजान ईद निमित्त ईद-ए-मिलाप या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या पक्षप्रवेश व ईद-ए-मिलाप च्या कार्यक्रमासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य श्री अजित दादा पवार यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी प्रस्ताविक पर भाषणामध्ये शेख निजाम यांनी बीड शहरातील महत्त्वपूर्ण असलेल्या नवीन ईदगाह बालेपिर येथे सिमेंट काँक्रेट रस्ता व काँक्रिटीकरण, अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिता मंजूर असलेले वस्तीग्रह च काम सुरू करणे, बीड जिल्ह्यात उर्दू घराची स्थापना करणे, इतर जिल्ह्याप्रमाणे बीड जिल्ह्यातील यूपीएसस एमपीएससीची तयारी करणाऱ्या अल्पसंख्यांक मुला मुलीं करिता स्टडी सेंटर व लायब्ररी स्थापित करणे, इस्लामपुरा ईदगाह येथे जागा अपुरी पडत असल्यामुळे बिंदुसरा नदी पात्रातील जागा उपलब्ध करून देणे, अल्पसंख्यांक बहुल भागात नियोजनबद्ध आराखडा तयार करून सदरील भागांचा नियोजनबद्ध विकास करणे आधी मागण्या उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या कडे केल्या या निमित्ताने उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना शेख निजाम हे महत्त्वकांक्षी व्यक्तिमत्व असून त्यांनी केलेल्या मागण्या चा सकारात्मक विचार करून त्या पूर्ण करण्यात येतील त्याचा पाठपुरावा शेख निजाम यांनी करावा व या मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात येतील असे आश्वासन दिले व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्याबद्दल एक निजाम व सहकार चे अभिनंदन करीत शेख निजाम सारख्या कार्यकर्त्यांची पक्षाला गरज असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शेख निजाम यांच्या पाठीशी पूर्णपणे ताकतीशी उभी राहील असे म्हटले सदरील कार्यक्रमास मा आ. प्रकाश दादा सोळंके, मा. आ. अमरसिंह जी पंडित, आ. विजयसिंह पंडित, आ. सतीश जी चव्हाण, आ. विक्रम काळे, माजी आ. संजय दौंड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण अँड गोरक्ष लोखंडे, राष्ट्रवादी ओबीसी सेल प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, योगेश क्षीरसागर, नारायण बप्पा शिंदे बळीराम गवते, बळी चव्हाण, प्रशिक्षित जाधव, अनुप मंत्री, संदीप पाटील, रितेश ढगे पाटील गोपाल धांडे, विजय चांदणे, सलीम शेख, समीर सय्यद, रईस चाऊस, सरपंच बिलाल पटेल, प्रज्ञाताई खोसरे, प्रियाताई डोईफोडे, शितलताई धोंडरे,लोकपत्रकार भागवत तावरे, अब्दुल वकील सर अस्लम अनवरी सर, नगरसेवक जैतुला खान, शेख इकबाल, रवींद्र कदम विनोद मुळूक, विलास विधाते, रमेश चव्हाण, सय्यद इलियास मुन्ना, इनामदार, रफिक नाशाद,यांच्या सह बीड शहरातील अनेक नगरसेवक मान्यवर व्यक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी सर्वसामान्य नागरिक व महिला वर्ग मोठ्या प्रमाणात आदी उपस्थित होते

### प्रवेश झालेल्या लोकांची नावे

शेख निजाम जैनुद्दीन ,शेख अमर जैनुद्दीन, मोमीन जुबेर ,खय्युम इनामदार, पठाण चुन्नू खान, जयंत वाघ ,आजम खान, जब्बार इनामदार ,मुजफ्फर चौधरी ,शेख, नसीर, हाजी अयुब खान पठाण ,शेख हमीद पीर मोहम्मद ,सय्यद फहीम, शेख इमरान शेख अदनान जमीर इनामदार सय्यद रियाज राजे व इतर

## बेदरवाडीत विवाहितेची आत्महत्या

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील बेदरवाडी त.३५ वर्षीय विवाह तिने गळफास घेतला पाटोदा तालुक्यातील बिदरवाडी येथील ज्योती ज्ञानदेव बेद्रे या पस्तीस वर्षे युवायतेने ३१ मार्च रोजी राहत्या घरी लोखंडी अँगल ला दोरीने गड पाच घेतला आत्महत्याचे कारण अपष्ट आहे याप्रकरणी ज्ञानदेव बेद्रे यांनी दिलेल्या माहितीवरून पाटोदा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१६१
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- २५/०३/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १)मधुकर कमळाजी दिवटे सर्व्हे नं. ३८ सहन प्लॉट नं. ९ न.प.मि.न.१८-७७-९/१ व सहन प्लॉट नं. १० न.प.मि.न.१८-७७-१०/१ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- पूर्व नऊ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
पश्चिम :दादाराव गंगाराम व शिवा गंगाराम यांचा प्लॉट
दक्षिण- प्लॉट नं. ९ मधील भाग
उत्तर : प्लॉट नंबर १० मधील भाग

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

cmyk

# मराठवाड्यातील १४० प्रकल्पांतील पाणीसाठा जोत्याखाली

संभाजीनगर : मराठवाड्यातील एकूण ७५१ लघू प्रकल्पांपैकी १५ व मध्यम ७५ प्रकल्पांपैकी १ मिळून १६ प्रकल्प कोरडे पडले आहेत. दुसरीकडे १२९ लघू व ११ मध्यम प्रकल्प मिळून १४० प्रकल्पांतील पाणीसाठा जोत्याखाली गेला आहे.

पाणीसाठा जोत्याखाली गेलेल्या ११ मध्यम प्रकल्पांत जालना,धाराशिव, नांदेडमधील प्रत्येकी १ व बीड मधील ८ प्रकल्पांचा समावेश आहे. कोरड्या पडलेल्या १५ लघू प्रकल्पात हिंगोलीतील ६, बीडमधील ५, लातूर, धाराशिवमधील प्रत्येकी एक व जालन्यातील २ लघू प्रकल्पांचा समावेश आहे. जोत्याखाली पाणीसाठा गेलेल्या १२९ लघू प्रकल्पात धाराशिवमधील सर्वाधिक ४३, बीडमधील ३५, जालन्यातील २०, नांदेडमधील १४, हिंगोलीतील ३, परभणीतील ८, लातूरमधील ६, लघू प्रकल्पांचा समावेश आहे. मराठवाड्यातील ७५ मध्यम प्रकल्पांपैकी १७ प्रकल्पात २५ टक्क्यांपेक्षा कमी तर ३६ प्रकल्पांत २५ ते ५० टक्के, ९ प्रकल्पात ५० ते ७५ टक्के, तर छत्रपती संभाजीनगर



जिल्ह्यातील केवळ एका प्रकल्पात ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली. मराठवाड्यातील २११ लघू प्रकल्पात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे. तर २२६ प्रकल्पांत २५ ते ५० टक्के, ०० प्रकल्पात ५० ते ७५ टक्के, तर केवळ ६२ लघू प्रकल्पात ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा शिल्लक आहे. ७५ टक्क्यांपेक्षा जास्त पाणीसाठा असलेल्या लघू प्रकल्पांची संख्या छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक ४६, तर बीडमध्ये ९, लातूर २, धाराशिव ३, तर नांदेड परभणीमधील प्रत्येकी एका प्रकल्पाचा समावेश आहे. परभणी जिल्ह्यातील २२ लघू प्रकल्पांत केवळ दोन टक्के उपलब्ध पाणी साठा शिल्लक आहे. हिंगोली जिल्ह्यातील २७ लघू प्रकल्पांत १९ टक्के, नांदेड मधील ८० प्रकल्पांत ३५ टक्के, धाराशिवमधील २०६ प्रकल्पांत ३४ टक्के, लातूरमधील १३५ प्रकल्पात ४३ टक्के ,बीडमधील १२६ प्रकल्पांत २७ टक्के, जालन्यातील ५७ प्रकल्प २८ टक्के, तर छत्रपती संभाजीनगरमधील ९८ लघू प्रकल्प २५ टक्केच उपयुक्त पाणी शिल्लक असल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

### उपयुक्त पाणीसाठा ४३ टक्क्यांवर

मराठवाड्यातील ८७९ मोठ्या, मध्यम, लघू प्रकल्पांसह गोदावरी, तेरणा, मांजरा, रेणा नदीवरील बंधाऱ्यांमधील उपयुक्त पाणीसाठा ४३.९० टक्क्यांवर आला आहे. यामध्ये ७५ माध्यम प्रकल्पांमध्ये असलेल्या ३५ टक्के उपयुक्त पाणीसाठ्यासह ७५१ लघू प्रकल्पांतील केवळ २६.६२ टक्के, गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यांतील २६.२७ टक्के, तेरणा, मांजरा रेणा नदीवरील ८९.४९ टक्के उपयुक्त पाणीसाठ्याचा समावेश आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८८२ : ब्रिटन च्या पहिल्या इलेक्ट्रिक ट्राम ईस्ट लंडन मध्ये चालू झाल्या .
१९४४ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश व अमेरिकन फौजांनी रुमानियातील बुखारेस्टवर केलेल्या बॉम्बहल्ल्यात ३००० नागरिक ठार झाले.
१९४९ : पश्चिम युरोपातील अकरा देश आणि अमेरिका अशा १२ देशांनी संरक्षणविषयक सामंजस्य करार करुन 'नाटो'ची स्थापना केली.
१९४९ : पश्चिम युरोपातील राष्ट्रे व अमेरिका यांच्यात संरक्षणविषयक उत्तर अटलांटिक करार म्हणजे 'नाटो करार' करण्यात आला.
१९६८ : 'नासा'ने 'अपोलो-६' चे प्रक्षेपण केले.
१९६८ : मेम्फिस, टेनेसी येथे जेम्स अर्ल रे याने मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) यांची हत्या केली.
१९९० : लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२३ : सर कार्ल विल्हेम सिमेन्स जर्मन/ब्रिटिश विद्युत अभियंता, अभियांत्रिकी क्षेत्रात काम करणारी 'सिमेन्स' ही बलाढ्य कंपनी त्याच्याच भावाने स्थापन केली आहे. (मृत्यू: १९ नोव्हेंबर १८८३)
१८४२ : एडवर्ड लूकास फ्रेन्च गणिती (मृत्यू: ३ आक्टोबर १८९१)
१८९३ : पायोनियर इन्स्ट्रुमेंट कंपनी चे सहसंस्थापक चार्ल्स हर्बर्ट कॉल्विन यांचा जन्म. (मृत्यू: ३ जुलै १९८५)
१९०२ : पं नारायणराव व्यास ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक (मृत्यू: १ एप्रिल १९८४)
१९०६ : फिशर इलेक्ट्रॉनिक्स चे स्थापक एवेरी फिशर यांचा जन्म. (मृत्यू: २६ फेब्रुवारी १९९४)
१९३३ : रामचंद्र गंगाराम तथा 'बापू' नाडकर्णी डावखुरे मंदगती गोलंदाज
१९७३ : भारतीय संचालक आणि पटकथालेखक चंद्र शेखर येलेती यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६१७ : जॉन नेपिअर स्कॉटिश गणितज्ज्ञ, लॉगॅरिथम सारणीचे जनक (जन्म: ? ? १५५०)
१९२३ : जॉन वेन ब्रिटिश गणितज्ञ (जन्म: ४ ऑगस्ट १८३४)
१९३१ : आंद्रे मिचेलिन फ्रेन्च उद्योगपती (जन्म: १६ जानेवारी १८५३)
१९६८ : मार्टिन ल्युथर किंग (ज्युनिअर) कृष्णवर्णीयांचे गांधी म्हणून ओळखले जाणारे अमेरिकेतील मानवी हक्क कार्यकर्ते आणि नोबेल पारितोषिक विजेते यांची हत्या (जन्म: १५ जानेवारी १९२९)
१९७९ : पाकिस्तानचे चौथे राष्ट्राध्यक्ष आणि ९ वे पंतप्रधान झुल्फिकार अली भूट्टो यांना फाशी (जन्म: ५ जानेवारी १९२८)
१९८७ : सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन तथा 'अज्ञेय' ज्ञानपीठ पारितोषिक (१९७८) व साहित्य अकादमी पुरस्कार (१९६४) विजेते हिन्दी लेखक व वृत्तपत्रकार (जन्म: ७ मार्च १९११- खुशीनगर, देवरिया, उत्तर प्रदेश)
१९९६ : आनंद साधले संस्कृत वाङ्मयातील अनेक ग्रंथांचा मोठ्या रसाळ पद्धतीने मराठीत परिचय करुन देणारे साहित्यिक (जन्म: ५ जुलै १९२०)
२००० : वसंतराव कृष्णाजी गोंधळेकर कलादिग्दर्शक (जन्म: )
२०१६ : भारतीय वकील आणि राजकारणी पी. ए. संगमा यांचे निधन. (जन्म: १ सप्टेंबर १९४७)

# तुती लागवड एक शेतीपूरक व्यवसाय



शेतकरी पिढ्यानपिढ्या पारंपरिक शेती व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, काही शेतकरी नव्या वाटा शोधून शेतीमधून भरपूर उत्पन्न कमावत असतात. रेशीम शेती म्हणजेच तुती लागवड ही अशा शेतकऱ्यांसाठी एक चांगला मार्ग आहे. थोडे कष्ट, व्यवस्थितपणा व शिस्त यांचा अवलंब केला तर कमी खर्चात रेशीम शेतीतून भरघोस उत्पन्न घेता येते व आपल्या कुटुंबातील सर्वांना रोजगारही पुरवता येतो. जाणून घेऊया तुती रेशीम शेती विषयी

रेशीम शेतीचे महत्त्व : रेशीम शेती हा शेतीपूरक उत्कृष्ट जोडधंदा आहे. वर्षातून ४ ते ५ पिके घेता येतात. एकदा केलेली तुती लागवड १० ते १५ वर्षे टिकते. पर्यावरणपूरक व्यवसाय, कमीत कमी रासायनिक खतांचा वापर, घरातील प्रत्येक व्यक्तीला घरातच रोजगार मिळतो. त्यामुळे मजुरीचाही प्रश्न मिटतो. इतर पिकांच्या तुलनेत कमी पाणी व खते लागतात. उत्पादित कोषांना बाजारपेठेत चांगला भाव मिळतो. शासनातर्फे नोंदणी झालेल्या शेतकऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

लाभार्थी शेतकऱ्यांसाठी अनुदान योजना :नवीन शेतकऱ्यांना एकरी ५०० रू. भरून लागवडीसाठी नोंदणी करून सभासद होता येते. अशा शेतकऱ्यांना अंडीपुंज अनुदान योजना, प्रशिक्षण, सिल्कसमग्र योजना अंतर्गत लाभ, मनरेगा, या अनुदान योजनांचा त्या शेतकऱ्यांनी शासनाचे आवश्यक ते निकष पूर्ण केल्यानंतर लाभ घेता येतो.

मगांराष्ट्रीयग्रा रोजगार हमी योजनेअंतर्गत तुती लागवड योजना :स्वतःच्या शेतीवर काम करून शासनामार्फत मजुरी मिळणारी ही एकमेव योजना आहे. शासनमान्य समूहात तुती लागवड (एका गावात किमान १० शेतकरी, १० एकर आवश्यक). रेशीम शेती योजनेंतर्गत पूर्वी लाभ घेतलेले शेतकरी नसावेत. कुटुंबातील एकाच व्यक्तीला लाभ मिळेल. प्रति लाभार्थी फक्त एक एकर तुती लागवड मर्यादा. लाभार्थी निवडीमध्ये नियमाप्रमाणे सामाजिक आरक्षण. ग्रामसभेच्या ठरावाद्वारे लाभार्थी निवड. मनरेगा अंतर्गत ३ वर्षांमध्ये अकुशल मजुरी म्हणून एकूण २ लाख ६५ हजार ८१५ रूपये व कुशल मजुरी रक्कम १ लाख ५३ हजार रूपये अशी एकूण ४ लाख १८ हजार ८१५ रूपये इतकी रक्कम मिळते. सिल्कसमग्र योजनेंतर्गत तुती लागवड, सिंचन संच, कीटक संगोपन गृह, कीटक संगोपन साहित्य, निर्जंतुकीकरण साहित्य यासाठी एक एकर तुती लागवडीकरिता सर्वसाधारण गटासाठी ३ लाख ७५ हजार रूपये तर अनुसूचित जातीसाठी ४ लाख ५० हजार रूपये व २ एकर तुती लागवडीकरिता सर्वसाधारण गटासाठी ४ लाख ६८ हजार ७५० रूपये तर अनुसूचित जातीसाठी ५ लाख ६२ हजार ५०० रूपये इतके अनुदान आहे.

# कमी पाण्यात पिके जगविण्यासाठी वापरा केओलिन



वाढत्या उन्हामुळे पिकाची पाण्याची गरज वाढते. पिकाची पाण्याची गरज कमी करण्यासाठी किंवा कमी पाण्यातही पिकाने तग धरुन राहावे यासाठी शेतकरी बरेच उपाय करतात. पण बऱ्याच शेतकऱ्यांना बाष्परोधकाचा वापर करुन कमी पाण्यात ही पीक जगवता येत हेच माहीत नाही.

बाष्पीभवनामुळे जस जमिनितून पाणी वाफ स्वरुपात निघून जात त्याप्रमाणेच बाष्पोत्सर्जनामुळे पिकाच्या पानांतून पाणी निघून जात असत. कडक उन्हामुळे तर बाष्पोत्सर्जनाच प्रमाण खुप वाढत. त्यामुळे झाडे सुकतात आणि पिकाची पाण्याची गरज वाढते. ड्रॅगनफ्रूट, द्राक्ष, डाळिंब, आंबा, संत्री आणि कलिंगड या सारख्या फळांवर काळे डाग पडतात. यालाच सनबर्न असेही म्हणतात. याशिवाय पाने करपणे, पिकाची वाढ खुंटणे, अन्नद्रव्यांचा पुरवठा कमी होणे अशी लक्षणे दिसून येतात. असं नुकसान होऊ द्यायच नसेल आणि झाडातील पाणी टिकवून ठेवायच असेल तर बाष्परोधकाचा वापर करतात.

बाष्परोधक हे पावडर स्वरुपात असत. ते विशिष्ट प्रमाणात पाण्यात मिसळून वापरल जात. बाष्परोधकाची जर फवारणी केली तर पानांवर बाष्परोधकाचा पांढरा थर जमा होतो. हा पांढऱ्या रंगाचा थर प्रखर सूर्यकिरणे पानांत किंवा फळांत जाऊ न देता तो वातावरणात परावर्तित करतो. त्यामुळे पानांतील पेशीद्रवाचे तापमान बाहेरील वातावरणातील तापमानापेक्षा ३ ते ४ अंश सेल्सिअसने कमी राहण्यास मदत होते. पानांमधून होणारे बाष्पोत्सर्जन २५ ते ३० टक्क्यांनी कमी होते. त्यामुळे कमी पाण्यातही पीक तग धरते.

कोणत बाष्परोधक चांगलं :बाजारात विविध प्रकराचे बाष्परोधक उपलब्ध आहेत त्यापैकी केओलिन हे बाष्परोधक जास्त परिणामकारक आहे. वजनाने हलक्या असलेल्या विशिष्ट दगडापासून हे केओलिन तयार करतात. बाजारात उपलब्ध असलेले कच्चे केओलिन हे पिकांना हानिकारक ठरते. कारण यामध्ये लीड, अर्सेनिक यासारखे विषारी घटक असतात. या केओलीनवर प्रक्रिया करुन ते शुद्ध केलं जातं. हे केओलिन जनावरांच्या औषधात, पशुखाद्यातही वापरल जात. केओलिनचा वापर केल्यानंतर पानांवर एक विशिष्ट प्रकारचा थर तयार होतो. हा थर पानाच्या आतील पेशी भोवती संरक्षक कवच म्हणून कार्य करते. त्यामुळे अनेक रसशोषक किडी आणि रोगाना प्रतिबंध होतो. त्यामुळे पिकांचे रोग व किडींपासूनही संरक्षण होते.

केओलिनचा वापर कसा करावा ?

केओलिनचा वापर हा फवारणीद्वारे केला जातो. फवारणीसाठी ५ ते १० ग्रॅम केओलिन एक लिटर पाण्यात मिसळून फवारावे. उन्हाळ्यात कमीत कमी १० ते १५ दिवसांच्या अंतराने केओलिनची फवारणी करावी. म्हणजे पाणी कमी असेल तर पीक तग धरुन राहील. तुमच्याकडे जर पाणी कमी असेल आणि फळबाग असेल तर केओलीनचा वापर करुन बघा.

# कर्जमाफी, शेतीमालाला भाव दिला नाही

### महायुती सरकारच्या जाहीरनाम्याची होळी करण्याचा इशारा



पुणे : महायुती सरकारच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी, मोफत वीज, शेतमालाला हमीभाव, महिलांना २१०० रुपये आर्थिक मदत, बेरोजगारांना १० हजार भत्ता, जेष्ठ नागरिकांना दरमहा २१०० रुपये अनुदान आदी आश्वासने दिली होती. मात्र सरकारने ही आश्वासने पूर्ण न करता शेतकऱ्यांना कर्जफेडीच्या नोटिसा पाठवण्यास सुरुवात केली आहे, याच्या निषेधार्थ स्वतंत्र भारत पक्षाने राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी सांगितले की, शासनाने आठ दिवसांत कर्जवसुली थांबवावी व आश्वासने पूर्ण करावी, अन्यथा १४ एप्रिलपासून राज्यभर जाहीरनाम्याची होळी केली जाईल. स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या आंदोलनात महिला, युवक, बेरोजगार, कर्जदार शेतकरी आणि जेष्ठ नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अनिल घनवट यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना निवेदन पाठवून आठ दिवसांत आश्वासने पूर्ण करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, १४ एप्रिलपासून राज्यभर जाहीरनाम्याची आणि बँक वसुलीच्या नोटिसांची होळी करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. घनवट म्हणाले की, महायुती सरकारच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी, मोफत वीज, शेतमालाला हमीभाव, महिलांना २१०० रुपये आर्थिक मदत, बेरोजगारांना १० हजार भत्ता, जेष्ठ नागरिकांना दरमहा २१०० रुपये अनुदान आदी आश्वासने दिली होती. मात्र ही आश्वासने पूर्ण केली जात नाहीत. उलट शेतकऱ्यांना कर्जवसुलीच्या नोटीसा पाठवल्या जात आहेत. याविरोधात लढा उभारण्यात येणार आहे. या आंदोलनात शेतकरी संघटना, बेरोजगार तरुण, लाडकी बहिण योजना लाभार्थी, जेष्ठ नागरिक आणि इतर घटक मोठ्या प्रमाणावर सहभागी होणार आहेत. महिला, तरुण आणि शेतकऱ्यांनी युती सरकारच्या विरोधात एकजूट होण्याचे आवाहन स्वतंत्र भारत पक्ष आणि शेतकरी संघटनेने केले आहे.

# मुक्तसंचार गोठापद्धत : काय आहेत फायदे ?

दुग्ध व्यवसाय यशस्वी करण्यासाठी काही महत्वाच्या गोष्टींबाबत जसे जनावरांचे आजार, त्यांचा माज याविषयी सतर्क राहणे आवश्यक असते.

बंदिस्त गोठ्यात दुधाळ जनावरांना थायलेरियासीस, कासदाह, किटोसिस हे मुख्य ३ आजार होतात. बंदिस्त गोठ्यात गोचिडांना लपण्यास भरपूर जागा असते. त्यांच्यामुळे जनावरांना विविध रोग होतात. बंदिस्त गोठ्यात जनावर जेथे उभे राहते तेथे शेण, मल-मूत्र पडत असल्याने ती जागा कायम ओली राहते. त्यावर काडीकचरा पडलेला असतो. त्यावरच जनावरे बसतात. त्यामुळे कासदाह रोग होतो. गायी-म्हशी मुका माज दाखवितात. बंदिस्त गोठ्यात ही गोष्ट लक्षात येत नाही; मात्र मुक्त संचार गोठा पद्धतीत अशा गाईला ओळखणे सोपे होते. माजाची लक्षणे लगेच ओळखता येतात आणि माज ओळखता येणे हेच तर दुग्ध व्यवसाय यशस्वी होण्यामागील कारणांपैकी एक गमक आहे. यातून मुक्तता मिळावी म्हणून मुक्त संचार गोठा पद्धत वापरली जाते.

मुक्तसंचार गोठा पद्धत म्हणजे काय

१. मुक्तसंचार गोठ्या मध्ये गाईंना बांधले जात नाही. २ . गाईंना एका मोठ्या कंपाऊंड मध्ये शेड बांधून मोकळे सोडले जाते. ३. त्यांच्या चाऱ्याची व पाणी पिण्याची व्यवस्था तिथेच गव्हाणा मध्ये करण्यात येते. ४. शेण वारंवार काढले जात नाही. ५. गाई एकमेकांना मारत नाहीत.

मुक्त संचार गोठा पद्धत :एका गाईला किंवा



म्हैशीला मुक्त संचार पद्धतीच्या गोठ्यात मोकळे सोडण्यासाठी कमीत कमी २०० चौ. फूट जागा लागते. एक गुंठा जमीन क्षेत्रात आपण पाच मोठी जनावरे मोकळी सोडू शकतो. गाईला मुक्त सोडण्यापूर्वी तार जाळीचे किंवा भिंतीचे अर्ध्या जाळीयुक्त कंपाउंड करून आत मध्ये गव्हाण व पाण्याच्या हौदाची व्यवस्था करणे आवश्यक असते. गाईला मोकळे सोडल्यावर एक ते दोन दिवस मुक्त पद्धतीची सवय लागण्यात जातात. या कालावधीत शेतकऱ्याने सतर्कता बाळगायला हवी. गाई मोकळ्या सोडल्यावर त्या एकमेकींना मारतील या भीतीने शेतकरी मुक्त गोठा पद्धत अवलंब करण्यापासून माघार घेतात. परंतु पहिले दोन दिवस सवय लागल्यावर गाई एकमेकांना मारत नाहीत. जर एखादी गाय इतर गाईंना मारत असेल तर तिला पायकूट घालून आपण प्रतिबंध करू शकतो. गाईच्या तोंडाच्या म्होरकीला एक बाज व कोणत्याही एका पायाच्या गुडघ्याच्या थोडेसे वर असे दोरीच्या साहाय्याने आखडून बांधणे म्हणजेच पायकूट घालणे होय. अशा प्रकारे आपण जनावरांच्या हालचालीवर प्रतिबंध घालू शकतो.

मुक्त संचार पद्धतीत एका गाईला १५० ते २०० चौ. फूट याप्रमाणे जागा उपलब्ध करून देणे, याशिवाय सावली आणि ऊन, पिण्याचे पाणी, चारा आणि तेथेच दूध काढण्याची सोय उपलब्ध केल्यामुळे त्यांना पाहिजे त्या वेळी त्यांच्या आवडीनुसार आणि वेळेनुसार चारा खातात, पाणी पितात, हवामानातील बदलानुसार ऊन- सावली घेतात, च्छ जागेत जाऊन बसतात, त्यामुळे त्यांच्या शरीराला शेण लागत नाही, स्वच्छंदाने त्या फिरतात. त्यांच्या इच्छेनुसार निवांत बसून चांगले रवंथ करतात. त्यामुळे दुधाचे उत्पादन वाढते. त्यांना फिरता येत असल्यामुळे नखे वाढत नाहीत, गोचीड होत नाहीत, आजाराचे प्रमाण कमी होते. मोकळ्या सोडलेल्या गाईंच्या अंगावर एक वेगळी चकाकी येते. त्यांनी दिलेल्या दुधातील जैविक घटकांमध्ये निश्चितच बदल होत असतील.

मुक्त संचार गोठा पद्धतीचे फायदे : १. स्वच्छतेसाठी कमी वेळ लागतो व मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होते.

२. कमी मनुष्यबळ लागते. ३. गोठे बांधण्यावरील खर्च कमी होतो. ४. खाद्य,चारा व पाणी यांचा योग्य उपयोग होतो. ५. जनावरांना व्यायाम मिळाल्याने ते निरोगी राहतात. ६. स्तनदाहाचे प्रमाण कमी होते. ७. जनावरे मुक्तपणे माज दाखवतात. ८. ताण कमी होतो आणि उत्पादनात ५ ते १० टक्के वाढ होते. ९. प्रजननासंबंधी समस्या कमी होतात. १०. खुरांची योग्य निगा राखल्याने जनावरे लंगडत नाहीत. ११. जनावरांची झपाट्याने वाढ होते व उत्पादन वाढते.

# अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेस ६ कोटी ६२ लक्ष रुपयांचा करपूर्व नफा

## वर्ष अखेर ५७३ कोटींच्या ठेवी जमा करत ०% नेट एन पी ए राखण्यात बँकेस यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेने सन २०२४-२०२५ मधील केलेल्या उत्तम कामकाजामुळे ३१ मार्च २०२५ अखेर बँकेने ५७३ कोटींच्या ठेवी जमा करत वर्षाखेरीस ०% नेट एन पी ए राखण्यात यश मिळवले आहे. त्याबरोबरच मार्च २०२५ अखेरीस बँकेस ६ कोटी ६२ लक्ष एवढा करपूर्व नफा मिळवल्याचे बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. बँकेने मिळवलेले हे यश बँकेचे सर्व सन्माननीय संचालक, ठेवीदार, ग्राहक तसेच सभासदाच्या विश्वास व सहकार्याच्या भावणेमुळेच शक्य झाले असल्याचे देखील या पत्रकात नमूद केले आहे.

मार्च २०२५ अखेर बँकेची एकूण सभासद संख्या १२५८६ एवढी असून बँकेकडे ५७३ कोटीच्या ठेवी जमा झाल्या आहेत. त्याच्या बळावरच बँकेच्या सभासद तथा ग्राहक बांधवाना मार्च २०२५ अखेर रु.३३० कोटी इतके कर्जवाटप केले आहे. या आर्थिक वर्षाचे रु.१९ कोटी एवढे भाग भांडवल असून बँकेचा स्वनिधी रु.५० कोटी एवढा आहे. त्याचबरोबर वर्ष अखेरीस बँकेने एकूण रु. २९० कोटी एवढी गुंतवणूक केली आहे . ३१ मार्च २०२५ अखेर बँकेने एकूण ठेवी रु. ५७३ कोटी इतक्या जमा केलेल्या आहेत . गतवर्षीच्या तुलनेत तब्बल २३ कोटी रुपयांची व्यवसायात वाढ झाली आहे. बँकेस ३१मार्च २०२५ अखेर रु. ६ कोटी ६२ लक्ष इतका करपूर्व नफा मिळवला आहे. सर्व क्षेत्रातील आर्थिक परिस्थिती पाहता बँकेचे संचालक मंडळ, अधिकारी , कर्मचारी वृंद तसेच कर्जदार , ठेवीदार व सभासद यांच्या सांघिक कामगिरीमुळे बँकेस हे प्रगतीचे उद्दीष्ट साध्य करता आले असल्याचे बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी, उपाध्यक्ष प्रकाश सोळंकी व मुख्य कार्यकारी अधिकारी धनंजय देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्राद्वारे सांगितले आहे . मार्च २०२५ अखेरील बँकेची प्रगती ही बँकेच्या पुढील वाटचालीस नवीन उभारी देणारी असून बँकेच्या सभासदांनी व ग्राहकांनी बँकेवरील विश्वास कायम ठेवल्याची पावती असल्याचे देखील मोदी यांनी नमूद केले आहे. चालु आर्थिक वर्षात अनंत अडचणी येऊनही बँकेच्या वसुली विभागाने समाधानकारक काम करत बँकेचा निव्वळ एनपीए ०% राखण्यात बँकेने यश मिळवले आहे .



देशातील आर्थिक परिस्थिती वाढती महागाई, बेरोजगारी अशा अवघड परिस्थिती देखील कर्जधारक , ग्राहकांचा विचार करुन बँकेने सुरळीत आर्थिक व्यवहार करत बँकेची आर्थिक स्थिती समाधानकारक ठेवण्यास यश मिळवले आहे असे मत बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले. बँकेचे सर्व सभासद, ग्राहक यांचा विश्वास, बँकेचे संचालक मंडळ तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे उत्कृष्ट नियोजन व बँकेच्या अधिकारी व कर्मचारी वृंदाचे नियोजनबध्द कामकाज यामुळे सन २०२४ - २०२५ मध्ये चांगले कामकाज करणे शक्य झाले आहे. अशीच कामगिरी पुढील आर्थिक वर्षातही कायम ठेवण्याचा बँकेचा प्रयत्न असेल अशी ग्वाही अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी जाहीर केलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे .

१९९६ साली केवळ एका शाखेद्वारे अतिशय अल्प अशा भांडवलावर सुरू झालेली अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँक आज ५७३ कोटीच्या ठेवीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्याच्या बीड, लातूर, धारशिव, छत्रपती संभाजी नगर, पुणे अहिल्यानगर या जिल्ह्यात २० शाखांच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा देत आहे. नुकतीच भारतीय रिझर्व्ह बँकेने केज, मुरुड व निलंगा या ठिकाणी बँकेच्या नवीन तीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या सर्व नियमांच्या आधीन राहूनच अंबाजोगाई पिपल्स बँकेने आजपर्यंत सर्व आर्थिक व्यवहार करत आहे. या कामगिरीच्या बळावरच रिझर्व्ह बँकेने नवीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिल्याचे मोदी यांनी या पत्रकात नमूद केले आहे. अंबाजोगाई पिपल्स बँक अर्थकारण करत करतच अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित आहे. ज्यामध्ये शहरातील गुणिजनांचा सन्मान , रक्तदान शिबिर याबरोबरच महिलांसाठी बँकिंग प्रशिक्षण शिबिर, विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात बँक अग्रस्थानी असते.या व अशा इतर अनेक कारणांमुळे बँक ग्राहकांच्या प्रथम पसंतीस उतरली असल्याचे समाधान बँकेचे अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केले आहे .यापुढेही बँकेचे सन्माननीय संचालक प्रा वसंत चव्हाण, ॲड विष्णुपंत सोळंके, अरुण काळे,पुरुषोत्तम चोकडा, सुरेश मोदी,ॲड सुधाकर कऱ्हाड, संकेत मोदी, शेख दगदुभाई शेख दावल, सुधाकर विडेकर, प्रकाश लखेरा,हर्षवर्धन वाडमारे, श्रीमती वनमाला रेड्डी, सौ स्नेहा हिवरेकर, प्रा. लक्ष्मण दासूद , सचिन बेंबडे यांच्या सहकार्याने अर्थकारणासोबतच वारंवार असेच सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रम राबविण्यात येतील असा संकल्प राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला.

## थोडक्यात

### जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षण घेण्यास सहभागी होणे बाबत आवाहन

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात विविध खेळांचा प्रचार व प्रसार होऊन जिल्ह्यातील खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी व्हावेत हा उद्देश ठेऊन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे राज्य शासनामार्फत नियुक्त तज्ञ क्रीडा मार्गदर्शक यांचे मार्फत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्हा परिषद कन्या प्रशाला, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड, जिल्हा क्रीडा संकुल, बीड, येथे सॉफ्टबॉल, बेसबॉल व मैदानी खेळाचे प्रशिक्षण केंद्र नियमीत सुरू आहे. जिल्हा परिषद कन्या प्रशाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे (सकाळी ०७.०० ते ९.०० वाजेपर्यंत आणि जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे दुपारी ०४.३० ते ०७.०० वाजेपर्यंत सॉफ्टबॉल खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड, बेसबॉल खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार व मैदानी खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील हे प्रशिक्षण देत आहेत.बीड शहर व जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सदर प्रशिक्षण केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांनी केले आहे. अधिकच्या माहितीसाठी क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड (मो. ९९२३०१९३५३), क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार (मो. ९०७५४७६७९१) व क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील (मो. ९६२३७८११२१) यांच्याशी संपर्क साधावा. असे जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांचे वतीने कळविण्यात येत आहे.

### जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-यांविरूध्द प्राप्त होणा-या तक्रारीबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड यांचे अध्यक्षतेखाली दि. ०७ एप्रिल २०२५ रोजी स. १०.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आलेली आहे.याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी / कर्मचा-यांविरूध्द भ्रष्टाचारासंबंधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीशः उपस्थित राहून पुराव्यासह लेखी स्वरूपात मांडाव्यात. सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी समितीमध्ये घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जि. भ्र. नि.स. तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑलिव रेस्टॉरंट अँड बॅन्क्वेटचे उद्‌घाटन

## पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती



बीड। प्रतिनिधी

बीड शहराच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या ऑलिव रेस्टॉरंट अँड बॅन्क्वेट्सचा दिमाखदार उद्घाटन सोहळा बुधवार दि.२ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता नगर नाका येथे आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या शुभहस्ते फीत कापुन ऑलिव्ह रेस्टॉरंट चे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्तविक प्रतिक भोपळे यांनी केले. यावेळी नगर नाक्यावर बीडची मुंबई अवतरली आहे असे सांगत. ऑलिव रेस्टॉरंट अँड बँक्वेट सेवेत दाखल होत असल्याचा आनंद व्यक्त केला. माझ्या संकल्पनेतील हे प्युअर व्हेज रेस्टॉरंट पुणे मुंबई सारख्या मोठ्या शहरातील हॉटेलची मजा आता बीडकर घेऊ शकणार आहेत. यामध्ये तळ मजल्यावर फास्ट फूड सेंटर, दुसऱ्या मजल्यावर एसी बँक्वेट हॉल, तर तिसऱ्या मजल्यावर रूफटॉप रेस्टॉरंट अँड एसी डायनिंग हॉल ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहे. लहान मुलांना विरंगुळा म्हणून टेरेस गार्डन ची सुविधा या ठिकाणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. ग्रीक थीम वापरून या हॉटेलची उभारणी करण्यात आली असून ही बीडकरांसाठी एक मेजवानी ठरणार आहे असे इंजि.प्रतीक भोपळे यांनी आपल्या प्रस्ताविकात सांगितले.

ऑलिव रेस्टॉरंट अँड बॅन्क्वेट्सच्या भव्य दिव्य उद्घाटनाच्या अनुषंगाने शुभेच्छा देताना उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार म्हणाले कि, बदलत्या सामाजिक परिस्थिती प्रमाणे बीड शहर सुद्धा नव्या गोष्टी स्विकारत आहे. आज जगभर विविध खाद्य संस्कृतीचे भव्य रेस्टॉरंट निघत आहेत.त्या सर्व रेस्टॉरंटचा अभ्यास करून तरुण उद्योजक प्रतीक भोपळे याने अभियांत्रिकी पदवी मिळवल्या नंतर सुद्धा नोकरीच्या मागे न लागता रेस्टॉरंट क्षेत्राचा अभ्यास करून बीड शहरातील खवय्यांसाठी जागतिक बदलाचा विचार करून हेल्दी, रुचकर, स्वादिष्ट खाद्य पदार्थ बीड शहराच्या ऑलिव रेस्टॉरंट अँड बॅन्क्वेट्सच्या माध्यमातून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.प्रतिकने ऑलिव रेस्टॉरंट आणि बॅन्क्वेट्सचे इंटेरियर डिझाईन ग्रीक देशातील पध्दतीने केले आहे. त्यामुळे बीड शहरातील नागरिकांना पुणे मुंबई सारख्या शहरांमध्ये जाण्याची आता गरज पडणार नाही असे असे अजित दादा यांनी सांगितले. प्रत्येक व्यवसायामध्ये आत्मविश्वास अतिशय महत्त्वाचा असतो कारण आत्मविश्वासामुळे यशाचा मार्ग सुखकर होतो आणि हा आत्मविश्वास प्रतिक भोपळे या युवकाला त्याच्या आई-वडिलांकडून मिळाला आहे. प्रत्येक उद्योग हा यशस्वी होत असतो पण त्या उद्योगांमध्ये संपूर्णतः झोकुन दिलं पाहिजे तरच यश पदरी पडते असे ना.अजित दादा पवार उद्घाटन प्रसंगी सांगितले. याप्रसंगी ना.पंकजाताई मुंडे, फुलंब्रीच्या आ.अनुराधाताई चव्हाण यांनी प्रतिक भोपळे यांना शुभेच्छा देत आपले मनोगत व्यक्त केले. या उद्घाटन प्रसंगी उद्योजक भरत गीते, डॉ.हनुमंत भोसले, स्व.धुंडीराज महाराज पाटांगणकर उत्तराधिकारी तथा सुपुत्र पाटांगणकर संस्थांचे मताधिपती ह.भ.प. विनायक महाराज पाटांगणकर, माजी मंत्री सुरेश नवले, डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर, रिपाईचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, सर्जेराव तांदळे, संतोष हांगे, अदित्य सारडा, शुभम धुत, शुभम कांतागळे माजी नगरसेवक सुभाष सपकाळ, विनोद मुळूक, रणजीत बनसोडे, प्रा.प्रदीप रोडे, रावसाहेब उणवणे, आर्किटेक अजय नाईकवाडे, महेश पवार यांच्यासह समाजातील सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रातील उद्योजकांनी नागरिकांनी, अधिकारी आणि प्रतिनिधींनी यांनी आवर्जून उपस्थिती दर्शविली. आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत विश्वनाथ रावजी भोपळे, इंजि.राजेंद्र भोपळे, इंजि.प्रतीक भोपळे, आकाश वाघमोडे यांच्यासह भोपळे-वाघमोडे परिवारातील महिला यानिपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन निवेदक सुरेश साळुंके यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांचे आभार ऑलिव रेस्टॉरंट अँड बँक्वेटचे एम.डी.संजय धुरंधरे यांनी मानले. ऑलिव्ह रेस्टॉरंट अँड बँक्वेट मध्ये डायरेक्टर विजय मिश्रा, मॅनेजर अमरजीत दास, एक्झिक्युटिव्ह शेफ वीरसिंग यांच्यासह ५० जणांचा स्टाफ काम पाहणार आहे.

## सहकारी संस्थांसाठी चौकशी अधिकारी पॅनल तयार करण्यासाठी अर्ज मागविले

बीड । प्रतिनिधी

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांच्याकडून कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८३ व ८८ अंतर्गत चौकशी अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची पुरवणी नामतालिका (पॅनल) तयार करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

यासाठी सहकार खात्यातून निवृत्त अधिकारी (७० वर्षे वय पूर्ण न झालेल्या),निवृत्त न्यायाधीश,वकील आणि चार्टर्ड अकाउंटंट पात्र असतील.अर्जाचे विहित नमुने विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, लातूर विभाग तसेच लातूर, बीड,नांदेड आणि संबंधित जिल्ह्यांतील सर्व उपनिबंधक व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयांमध्ये १ एप्रिल २०२५ ते ३० मे २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील. इच्छुक उमेदवारांनी भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह संबंधित कार्यालयात विहित कालावधीत सादर करावेत. असे सहकारी संस्थेचे विभागीय सहनिबंधक, सुनिल शिरापूरकर यांनी कळविले आहे.

## लिंबागणेश ग्रामपंचायत मार्फत सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेशचे भुमिपुत्र शेख शफीभाऊ शेख अब्दुल हे नियत वयोमानानुसार पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग येथुन निवृत्त झाले असुन आज दि.०३ गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीच्या वतीने शाल , श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते.कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचलन भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. शेख शफीभाऊ यांचे वर्गमित्र निवृत्त अभियंता गणपत तागड यांनी तसेच पत्रकार हरीओम क्षीरसागर,माजी सरपंच बाळासाहेब मुळे, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, रमेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ.गणेश ढवळे यांनी शेख शफीभाऊ यांनी केलेल्या सेवेचा व त्यांच्या कार्याचा गुणगौरव करीत असताना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरचा काळ सुखी, समृद्धी, आनंदाने जावो व त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो यासाठी शुभेच्छा दिल्या.सत्कारमूर्ती शेख शफीभाऊ यांनी सत्काराला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील भोकरदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग याठिकाणी २६ वर्षे सेवा केल्यानंतर १५ वर्षे बीड जिल्ह्यातील पाटोदा याठिकाणी ३१ मार्च रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याचे सांगताना शासकीय नोकरी करत असताना गावच्या मातीची ओढ , त्यांना आलेले अनुभव कथन केले. ग्रामपंचायत मार्फत करण्यात आलेल्या सत्कार समारंभाबद्दल सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांचे आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी माजी सरपंच राजेभाऊ गिरे, संदिप मंडलिक, बाळकृष्ण थोरात,ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ , दामोदर थोरात, महादेव कुदळे, अशोक जाधव, अँड . गणेश वाणी,संतोष भोसले, अशोक वाणी,दादा गायकवाड, शेख खाजु,सय्यद रफिक,शेख अकबर मिस्त्री, आरूण ढवळे, राजेंद्र ढास ,अमोल जाधव ,राजेभाऊ आगवान आदि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

## लक्ष्मीबाई बेदरे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



येथील प्रसिद्ध सुवर्णदालन एस. एम. बेदरे सराफचे संचालक सुनील मच्छिंद्रनाथ बेदरे व सतीश मच्छिंद्रनाथ बेदरे यांच्या मातोश्री स्व. लक्ष्मीबाई मच्छिंद्रनाथ बेदरे यांचे वृद्धापकाळाने मंगळवार दि. ०१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८.४५ वाजता निधन झाले आहे.

स्व. लक्ष्मीबाई मच्छिंद्रनाथ बेदरे यांचे मृत्यू समयी वय ७५ वर्षाचे होते. सोमवारी रात्री अचानक त्यांच्या छातीत दुखू लागल्याने त्यांना बीड येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरु असताना मंगळवार दि. १/४/२०२५ रोजी सकाळी ८.४५ वाजता उपचारादरम्यान त्यांचे दुःखद निधन झाले आहे. अत्यंत मनमिळावू, प्रेमळ स्वभावाच्या असल्याने त्या मुळगाव रोहतवाडी आणि हल्ली मुक्काम असलेल्या बीड शहरातील संत तुकाराम नगर भागात सुपरिचित होत्या. त्यांच्या पार्थिव देहावर दुपारी ४.०० वाजता अमरधाम स्मशानभूमी मोंढा रोड, बीड येथे अंत्यविधी करण्यात आला.

# व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेस ७ कोटी ७५ लाखाचा नफा

बीड। प्रतिनिधी

येथील व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची गतवर्षी रिझर्व बँकेच्या निर्बंधातून मुक्तता झाल्यानंतर ३१ मार्च २०२५ अखेर बँकेची आर्थिक परिस्थिती उत्तम झाली आहे. बँक पूर्ववैभवा कडे वेगाने वाटचाल करत आहे. बँकेला चालू वर्षात ७ कोटी ७५ लाख रूपयांचा नफा झाला असून रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे सी.आर. ए. आर. ९ टक्के असल्यास बँक उत्तम असल्याचे मानते तो बँकेकडे आज ६४.४२ टक्के सी.आर.ए.आर. आहे. बँकेचे नेटवर्थ हे सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढले असून मार्च २०२५ अखेर बँकेचे नेटवर्थ २५ कोटी ७ लाख रूपये झाले असून बँक पूर्वपदावर येत असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांनी दिली.

> व्दारकादास मंत्री बँक ही भारतातील एकमेव बँक असून याची दाखल केंद्र शासनाचे सहकार मंत्रालयाने सहकारी बँकिंग क्षेत्राचे परिवर्तनासाठी शासनास सल्ला देणे साठी नियुक्त केलेल्या टास्क फोर्सने घेतली व व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेने निर्बंध उठण्यासाठी केलेल्या कामाचा आढावा घेवून त्याचा आदर्श भारतातील निर्बंध लागलेल्या सहकारी बँकांना देवून त्या बँका निर्बंधमुक्त होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केले. द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेचे व्यवहार आता पूर्ववत सुरु झाले असून कर्ज वाटपासाठी बँकेकडे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. त्यामुळे ज्यांना स्वतःची आर्थिक घडी बसवण्यासाठी कर्जाची आवश्यकता आहे. त्यांनी बँकेकडे संपर्क साधून आवश्यक असलेले कर्ज घ्यावे.
>
> – डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा, अध्यक्ष व्दारकादास मंत्री बँक

व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेच्या सभासद बैठकीत अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, बँकेची चौफेर प्रगती होत आहे. आवश्यक त्या तरतुदी बँकेने केल्या आहेत. बँकेकडे आज ६३ कोटी ६३ लाख इतक्या ठेवी आहेत. बँकेने दिलेले कर्ज हे रु.७९ कोटी ८२ लाख आहे. तर बँकेकडे राखीव व इतर निधी ४८ कोटी ९८ लाख रूपये इतका आहे. बुडीत संशयित निधीमध्ये ५३ कोटी ५५ लाख रूपये आहे आणि बँकेचे भाग भांडवल हे २०.०१ कोटी आहे. बँकेची शासकीय रोखे व इतर बँकेतील गुंतवणूक ६३ कोटी ४७ लाख रूपये इतकी आहे. रोख व बँक शिल्लक १७ कोटी ७७ लाख रूपये आहे. अशी बँकेकडे एकूण लिक्विडिटी ८१ कोटी २५ लाख रूपये आहे. यावरून बँक किती सक्षम आहे हे आपल्याला नक्कीच लक्षात येईल असे अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा म्हणाले. पुढे बोलतांना ते म्हणाले की, द्वारकादास मंत्री बँकेची स्थापना सन १९६२ मधे झाली होती. बँकेने ३५ टक्के ते ८५ टक्के लाभांशाचे वाटप करून देशभरात नाव केले. कालांतराने बँकेची भरभराट चालू असतांना काही तांत्रिक बाबीवरून बँकेवर प्रशासकाची नियुक्ती झाली व प्रशासकाचे भीतीने बँकेच्या ठेवीदारांनी मोठ्या प्रमाणात ठेवी काढून घेतल्या प्रशासक येण्यापूर्वी बँकेकडे रु.२८१ कोटीच्या ठेवी होत्या बँकेने मागेल त्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत केली त्यामुळे बँकेच्या ठेवी कमी झाल्या. बँकेची आर्थिक स्थिती उत्तम असतांना प्रशासकांनी दिलेल्या अहवालामुळे बँकेवर आर्थिक निर्बंध लागले होते निर्बंधाचे काळात व्यवहार बंद असल्यामुळे बँकेचे नियमित कर्जे मोठ्या प्रमाणात वसूल झाले जानेवारी २०२३ मधे बँकेवर संचालक मंडळ निवडून आले व बँकेस पुन्हा गत वैभव मिळणे साठी संचालक मंडळाने प्रयत्न चालू केले बँकेच्या भाग भांडवलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली,थकीत कर्जाची वसुली केली व भारतीय रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे आवश्यक निकषांची बँकेने पूर्तता केली आणि २६ फेब्रुवारी २०२४ रोजी बँकेवरील लावलेले आर्थिक निर्बंध भारतीय रिझर्व बँकेने उठवले त्यामुळे बँकेचे सर्व प्रकारचे व्यवहार पूर्ववत चालू झाले. बँकेवर आलेल्या सर्व अडीअडचणींवर मात करत बँकेचे सन्माननीय सभासद, ग्राहक व हितचिंतकांचे विश्वासाने बँकेने प्रगतीकडे वाटचाल चालू केली असल्याचे ते म्हणाले. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष शुभम चितलांगे, संचालक डॉ.अदिती सुभाषचंद्रजी सारडा, सी. ए.गिरीश गिल्डा, संतोष लहाने, अंजली पाटील, डॉ.अरुण मुंडे, सुधाकर वैष्णव, रघुनाथ चौधरी, डॉ. राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख सलीम, राम गायकवाड, सतीश धारकर, प्रल्हाद वाघ, बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन एस.एच., राधेश्याम सोनी, शाखाधिकारी धनंजय ताठे, संतोष काळे, कैलास सावंत यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## ग्रेस गुण अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने भरण्यास दिनांक ०८ एप्रिल पर्यंत मुदतवाढ

बीड। प्रतिनिधी

बीड जिल्हयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, प्रतिवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज मागविले जातात. त्या माहितीचे संकलन करुन कार्यालयाद्वारे सदरचे अर्ज माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत मंडळास ग्रेस गुण मिळणे करीता पाठविले जातात. सन २०२३-२४ पर्यतची ग्रेस गुण प्रक्रीया काही मानवी उणीवांमुळे हे काम अचुक व दोषरहीत होणे क्लिष्ट होत होती. व त्याचा फटका विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण न मिळण्याने बसत होता. या प्रश्नावर तोडगा आणि सदर सवलत गुण प्रक्रीया निर्दोष करण्यासाठी या वर्षीपासुन म्हणजेच २०२४-२५ पासुन ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रीया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे.

खेळाडू विद्यार्थी / जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार अ ॲपद्वारे या वर्षीपासुन सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडुन स्विकारला जाणार नाही जर अशी बाब कार्यालयाच्या निदर्शनास आली तर त्यासंदर्भात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था जबाबदार राहतील. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारचा सवलत गुणांबाबतचा ऑफलाईन अर्ज स्विकारण्यात येणार नाही. सर्व शाळा विद्यालय, उच्च माध्यमिक विद्यालय, विद्यार्थी यांनी दिलेल्या सुचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याची दक्षता घ्यावी. त्यानुसार खेळाडू विद्यार्थी व जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतील खेळाडू विद्यार्थ्यांना सदर प्रणालीद्वारे अर्ज करण्याबाबत अवगत करण्यात येत आहे. इ. १० वी व इ. १२ वी विद्यार्थाचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्या करिता दि. ३१ मार्च २०२५ ही तारीख जाहिर करण्यात आली होती. शासन निर्णयामधील तरतुदीनुसार क्रीडा गुण सवलत अर्जावर आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळावा या करिता दि. ३१ मार्च २०२५ रोजी पर्यंत दिलेली मुदत वाढवून ती दि. ०८ एप्रिल २०२५ करण्यात येत आहे. दि. ०८ एप्रिल २०२५ रोजी नंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत याची जिल्ह्यातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, खेळाडू विद्यार्थी यांनी नोंद घ्यावी.

# माझ्या मतदारसंघासाठी मी सक्षम आहे मला कुणाचेही फुकटचे गिफ्ट नको -आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

मतदार संघातील शिरूर कासार तालुक्यातील ब्रह्मनाथ येळंब आणि निमगाव मायंबा येथील कोल्हापूर बंधारे यांचे रूपांतरण मध्ये करण्याचा निर्णय कॅबिनेट पर्यंत आणण्याचे काम आम्ही केले आहे या कामासाठी मी २०१४ पासून प्रयत्न करत असून त्यानंतर २०२२, २०२३,२०२४, या कालावधीमध्ये देखील पाठपुरावा केल्यामुळे हा विषय कॅबिनेट मध्ये आला आणि कॅबिनेट मंत्री असल्यामुळे नामदार पंकजाताईंनी हा विषय पाहिला आणि वर्तमानपत्रात आष्टी मतदार संघाला गिफ्ट अशी बातमी छापून आणली केवळ श्रेय घेण्यात साठीच पंकजाताई मुंडे यांनी या गिफ्ट बाबत घोषणा केली आहे वास्तविक पाहता आष्टी मतदारसंघाला कोणत्याही फुकटच्या गिफ्टची आवश्यकता वाटत नाही आम्ही मतदारसंघाच्या विकास कामासाठी सक्षम आहोत या दोन बॅरेजच्या कामाबरोबरच आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये आणखीही काही बॅरेजेस मंजूर होणार आहेत त्यासाठी देखील आम्ही प्रयत्न करत आहोत दोन बॅरेज सारख्या कामाचे श्रेय घेणे योग्य नाही अशी परखड प्रतिक्रिया आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.



आमदार सुरेश धस पुढे म्हणाले कॅबिनेट मीटिंगमध्ये आलेला प्रस्ताव पाहून तुम्ही याचा फायदा घेतलेला आहे या बॅरेजेस च्या रूपांतरणाची श्रेय आमच्या पाठपुराव्यालाच आहे याची माहिती मतदारसंघातील जनतेला आहे या कामासाठी मी सन-२०१४ पासून प्रयत्न करत असून,यासाठी पहिल्या पासुन पाठपुरावा मी स्वतःकेला आहे. याबाबत दिलेल्या पत्रांचे पुरावे माझ्याकडे आहेत पुरावेही माझ्याकडे आहेत. वास्तविक पाहता पंकजाताई यांनी गिफ्ट द्यायचे होते तर आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यामधील मोठ्या प्रमाणावर असलेल्या पशुधन आणि दूध उत्पादन मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे पशुवैद्यकीय पशुसंवर्धन महाविद्यालय यांचे गिफ्ट आष्टी मतदार संघाला देणे योग्य होते परंतु आपण त्या विभागाच्या मंत्री झाल्यामुळे आपण ही महाविद्यालय परळी मतदारसंघात घेऊन गेलात परंतु परळी मध्ये किती दूध उत्पादन आहे आणि किती पशुधन आहे याची तुलना करावी आष्टी मतदार संघाला कोणतेही फुकटचे गिफ्ट नको.पंकजाताई यांनी कुठलाही पाठ पुरावा न करता केलेल्या कामांचे गिफ्ट आमच्या मतदारसंघाला देऊ नये.असा खरपुस समाचार आमदार सुरेश धस यांनी ना.पंकजा मुंडे यांचा नाव न घेता घेतला आहे.

पुढे बोलतांना ते म्हणाले,माझ्या मतदार संघातील शिरूर (कासार) तालुक्यातील ब्रम्हनाथ येळंव व निमगाव ता.शिरूर (का) जि.बीड या को.प.बंधा-यांचे बॅरेज मध्ये रुपांतरण करण्याचे कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी,जलसंपदा विभागामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.सदर कामाच्या प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती -१. नाशिक यांनी दि. ०५/०७/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर आहे.सदर प्रस्तावास मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मंजुरी आवश्यक आहे.ब्रम्हनाथ येळंब व निमगाव(मायंबा) ता.शिरूर (का) जि. बीड या को.प.बंधा-यांचे बॅरेज मध्ये रुपांतरण करण्याचे काम या प्रस्तावास आगामी मंत्रीमंडळ बैठकीमध्ये हे पत्र मी १३/१२/२०२४ रोजीच दिले होते.यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्या कामाचे कॅबिनेटमध्ये प्रस्ताव घेतल्याचे आपल्या जिल्ह्यातील कॅबिनेट मंत्रीमहोदय यांना समजताच या कामाचे श्रेय घेऊन आष्टी मतदारसंघाला आम्ही केलेले कामे दाखवून आम्हाला गिफ्ट देऊन नये असा खरपूस समाचार आ.सुरेश धस यांनी पंकजा मुंडे यांचा नाव न घेता घेतला आहे.

## विज पडून एका शेतकऱ्यासह गाईचा गेला जिव

केज । प्रतिनिधी

दुपारी केज तालुक्यातील आडस,केकानवाडी या भागात अवकाळी पाऊस झाला. यावेळी वीज कोसळून शेतकऱ्याचा अन्? गायीचा मृत्यू झाल्याची घटना तासभरा पूर्वी घडली आहे.

देवीदास शहाजी केकाण (वय ६५ वर्ष) रा. केकाणवाडी असे वीज कोसळून मयत झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून, ते दुपारी आसरडोह रस्त्याकडील नवरुका शिवारात जनावरे चारीत होते. यावेळी अचानक पाऊस आल्याने ते लिंबाच्या झाडाखाली उभे होते. यावेळी या झाडावर वीज कोसळून शेतकरी देवीदास केकाण जागीच ठार झाले तर एक गाय ही दगावली आहे. वेधशाळेने गारपीट व वादळीवाऱ्यासह अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला होता. या अंदाजा प्रमाणे आज दुपारी ३:३० वाजण्याच्या सुमारास केज तालुक्यातील आडस परिसरात सुसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. या घटनेची माहिती तालुका प्रशासन आणि आडस पोलीस चौकीला देण्यात आली आहे.

## श्रृंगेरी देवीचा शनिवारी जन्मोत्सव सोहळा

### भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ट्रस्टचे आवाहन

आष्टी । प्रतिनिधी

ब्रह्मगाव येथील शृंगेरी देवीचा जन्म उत्सव सोहळा शनिवार दि. ५ एप्रिल २०२५ रोजी धार्मिक कार्यक्रमाने संपन्न होत आहेत. या जन्मोत्सव सोहळ्याला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शृंगेरी देवी देवस्थान ट्रस्टने केले आहे.




शृंगेरी देवी हे देवस्थान आष्टी तालुक्यासह राज्यभर प्रसिद्ध आहे.शृंगेरी देवीचे भक्त संपूर्ण राज्यात असून हे भक्त देवीच्या विविध धार्मिक कार्यक्रमाला उपस्थिती लावून दर्शनाचा लाभ घेतात. वर्षभरामध्ये शृंगेरी देवी येथे विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात यामध्ये प्रामुख्याने पोर्णिमेला भरणाऱ्या यात्रा त्याचबरोबर नवरात्र उत्सव या प्रमुख कार्यक्रमाबरोबरच श्रंगीदेवी जन्मोत्सव सोहळा देखील श्री गिरी देवी देवस्थान मोठ्या उत्साहात साजरा करते. यावेळी विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होतात. यावर्षीचा सोहळा दि. ०५ एप्रिल २०२५ रोजी दूर्गाष्टमी या दिवशी मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या सोहळ्यानिमित्त सकाळी ११.२० वाजता अभिषेक, सकाळी ११.५० वाजता महाआरती, दुपारी १२.०० वाजता जन्मोत्सव कार्यक्रम नंतर देवीला पाळण्यामध्ये ठेवून देवीचे पाळणे गायण होईल व देवीला सौंदर्य अर्पण करण्यात येईल. येणाऱ्या सर्व भक्तांना महाप्रसाद वाटप केला जाईल. आधी धार्मिक कार्यक्रमांमध्ये हा सगळा संपन्न होणार आहे तरी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शृंगेरी देवी देवस्थान ट्रस्ट च्या वतीने करण्यात आले आहे.

## अध्यक्षपदी सचिन जावळे तर उपाध्यक्षपदी बाळू साळवे

माजलगाव । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जन्मोत्सव साजरा करण्यासाठी व या सोहळ्याचे नियोजन कसे करावे या हेतूने शहरातील पंचशिल नगर येथे दिनांक ०१ एप्रिल रोजी प्राथमिक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते , या बैठकीत सर्वानुमते कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती २०२५ पंचशील नगर च्या अध्यक्षपदी सचिन जावळे उपाध्यक्ष बाळु साळवे सचिव रामदास टाकणखार सहसचिव कच्छिद्र कांबळे कार्याध्यक्ष





कैलास टाकणखार कोषाध्यक्ष विनोद टाकणखार तर संघटक म्हणून अभिजित साळवे विशाल साळवे सुनील आलझेंडे रुद्रा कासार दादाराव तोडके सुहास टाकणखार ◀◀ पान २ वर

## चौसाळा येथे चावडी वाचन : पुरावे सादर करून सातबारा करा अद्ययावत

चौसाळा । प्रतिनिधी

**चौसाळा ग्रामपंचायत येथे चौसाळा व धोत्रा या सज्जा ची चावडी वाचन मा. तहसीलदार साहेब बीड याच्या मार्गदर्शनाखाली अभियान चा कार्यक्रम घेण्यात आला.**





महाराष्ट्र शासनाकडून शंभर दिवसाच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत जिवंत सातबारा या मोहिमेच्या माध्यमातून चौसाळा ग्रामपंचायत येथे मयत खातेदारांच्या यादीचे वाचन करून सातबारावर वारसाच्या नोंदी करण्याच्या अनुषंगाने मोहीम सुरू करण्यात आली. शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्राचे पुरावे सादर करण्याचे आव्हान तलाठी कमलेश निर्मळ यांनी केले एक ते पाच एप्रिल दरम्यान प्रत्येक गावात चावडीत ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्यामार्फत खातेदारांचे यादीचे वाचन करून मयत खातेदारांची यादी तयार केली जाणार आहे तसेच सहा ते २० एप्रिल या कालावधीत वारस नोंद घेण्याकरता तलाठी पोलीस पाटील सरपंच ग्रामसेवक दाखले मृत्यू प्रमाणपत्र चौकशी अहवाल करून वारसाच्या नोंदणी सातबारा घेतल्या जाणार आहेत दिनांक २१ ते दहा ◀◀ पान २ वर

## बीड जिल्हा बँकेचे पालकत्व पुणे जिल्हा बँकेने स्विकारावे

### राजकिशोर मोदी यांचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे मागणीपर निवेदन

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पालकत्व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अधिपत्याखाली असलेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्वीकारावे अशा प्रकारची मागणी अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे संस्थापक अध्यक्ष तथा अंबाजोगाई नगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी एका निवेदनाद्वारे अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. यावेळी त्यांच्या सोबत कापूस पणन महासंघाचे संचालक ॲड विष्णुपंत सोळंके हे होते.**



मागील काही वर्षांपासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आर्थिक स्थिती अतिशय डबघाईला आली आहे. त्यामुळे बँकेचे ग्राहक आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. बँक आर्थिक डबघाईतून बाहेर काढून शेतकऱ्यासह अन्य ग्राहकांना त्याचा लाभ होण्यासाठी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे पालकत्व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखालील असलेल्या पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने स्विकारावे, अशी मागणी राजकिशोर मोदी यांनी अजितदादा पवार यांच्याकडे केली आहे. बीड जिल्हा दौऱ्यावर असलेल्या अजितदादा पवार यांना मोदी यांनी जिल्हा बँकेच्या आर्थिक परिस्थिती बाबत अवगत केले. त्या बँकेमुळे जिल्ह्यातील हजारो ग्राहक आर्थिक विवंचनेत सापडले ◀◀ पान २ वर

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा- बाप्पूसाहेब मोरे

### शिवसेना बीड जिल्हा आढावा बैठक तथा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ!

बीड । प्रतिनिधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या अफाट यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनो पूर्ण ताकदीने कामाला लागा. शिवसेना सदस्य नोंदणीचे फॉर्म जास्त संख्येने भरून शिवसेना पक्ष संघटन मजबूत करा असे शिवसेना बीड जिल्हा संपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी शिवसेना बीड जिल्हा आढावा बैठक तथा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभा प्रसंगी आपले मत व्यक्त केले.



शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथजीशिंदे साहेब तथा खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना सचिव संजय मोरे साहेब, शिवसेना उपनेते व मराठवाडा संपर्कप्रमुख अर्जुनभाऊ खोतकर साहेब आणि मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, शिवसेना ◀◀ पान २ वर

## शाळा गुणवत्ता मूल्यांकन व अश्वासन आराखडा याची प्रभावी अंमलबजावणी करा- उपसंचालक प्रकाश मुकुंद

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचे स्वयं मूल्यमापन ऑनलाईन करून शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत प्रत्येक शाळेने स्वयं मूल्यमापन तात्काळ पूर्ण करावे तसेच मुख्यमंत्री महोदयाच्या सात कलमी १०० दिवसाचा कृती कार्यक्रम क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी राबवावा असे आवाहन संभाजीनगर विभागाचे विभागीय शिक्षण उप संचालक प्रकाश मुकुंद यांनी केले आहे.



विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय संभाजीनगर व शिक्षण विभाग जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरातील सौभाग्य लॉन्स येथे दिनांक ३ एप्रिल रोजी दुपारी ११ वाजता जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य यांची संयुक्त विशेष बैठक आयोजित केली होती त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते, यावेळी व्यासपीठावर सहाय्यक संचालक रवींद्र वाणी ,शिक्षणाधिकारी माध्यमिक नागनाथ शिंदे, ◀◀ पान २ वर

## जनसुरक्षा विधेयक रद्द करुन शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा

### विविध मागण्यांसाठी भिमशक्तीचे रास्ता रोको आंदोलन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जनसुरक्षा विधेयक रद्द करून शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा यासह एकूण ६ मागण्यांसाठी भिमशक्तीच्या वतीने तालुक्यातील ममदापूर (पाटोदा) या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. याप्रश्नी राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले. अशी माहिती भिमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भिमराव सरवदे यांनी दिली.



भिमशक्तीच्या वतीने राज्याच्या मुख्यमंत्र्यांना उपजिल्हाधिकारी यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, भिमशक्ती संघटनेच्या वतीने बीड जिल्हाप्रमुख डॉ.अमरेंद्र विद्यागर यांच्या सूचनेनुसार सदरील विषयाच्या अनुषंगाने सोमवार दिनांक १ एप्रिल रोजी तालुक्यातील ममदापूर (पाटोदा) या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करीत आहोत. मा.मुख्यमंत्री महोदयांना या निवेदनाच्या माध्यमातून नम्र विनंती करतो आहोत की, महाराष्ट्रात मागासवर्गीय, आदिवासी आणि मुस्लिम या तीनही समाज बांधवांवर जो अन्याय, अत्याचार होत आहे, तो थांबवावा. आपल्या पक्षाच्या जाहीरनाम्या मध्ये शेतकऱ्यांच्या कर्जा संबंधी शेतकरी बांधवांचा सरसकट कर्ज माफ करण्याचा मुद्दा आहे. तो शब्द आपण पाळावा, . ◀◀ पान २ वर

## ईद-उल-फित्र निमित्ताने राजकिशोर मोदी यांनी दिल्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा!

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सर्वधर्म समभाव तथा मानवतेचा संदेश जोपासत अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी रमजान ईद तथा ईद- उल-फित्र निमित्त ईदगाह मैदानात जाऊन ईदच्या नामजनंतर सर्व मुस्लिम बांधवाची गळाभेट घेत त्यांना ईद तसेच उज्वल आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी



राजकिशोर मोदी यांच्या सोबत माजी आमदार पृथ्वीराज साठे, किशोर परदेशी, महादेव आदमाणे , कचरूलाल सारडा, दिनेश भराडीया, सुनील वाघाळकर, गणेश मसने, धम्मा सरवदे, खलील जाफरी, रफीक गवळी, दत्ता सरवदे, जोगदंड यांची उपस्थिती होती.

मुस्लिम धर्मामध्ये रमजान महिना, या महिन्यात महिनाभर केले जाणारे रोजे व त्यानंतर येणाऱ्या ◀◀ पान २ वर

## महसूल विभागाचा आगळावेगळा उपक्रम : जिवंत सातबारा मोहिम

चौसाळा । प्रतिनिधी

महसूल व वनविभाग , महाराष्ट्र शासनामार्फत सातत्याने शेतकऱ्यांच्या हितासाठी व कल्याणासाठी वेगवेगळ्या योजना राबवण्यात येत असतात . त्यापैकीच एक म्हणजे ' जिवंत सातबारा मोहिम ' . महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिलेल्या निर्देशानुसार ही मोहीम संपूर्ण राज्यामध्ये राबवण्याचा उपक्रम सध्या सुरु आहे . बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक , उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड तालुक्यात ही जिवंत सातबारा मोहीम राबवण्यात येत आहे . या योजनेअंतर्गत सातबारा वरील सर्व मयत खातेदारांच्या नोंदीचे कामकाज पूर्ण करण्यासाठी बीड तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात जिवंत सातबारा मोहीम राबविली जात आहे.

कृती आराखडा :- महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासनातर्फे १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे . त्या अंतर्गत दिनांक १ एप्रिल २०२५ ते ५ एप्रिल २०२५ पर्यंत ग्राम महसूल अधिकारी ( तलाठी ) यांनी त्यांच्या सज्जा अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये चावडी वाचन करून ( न्यायप्रविष्ठ प्रकरणे सोडून ) गाव निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करून घ्यावयाची आहे . सध्या जिल्हाभरात ग्राम महसूल अधिकारी यासाठी फिरत आहेत.

त्यानंतर दिनांक ६ एप्रिल २०२५ ते दिनांक २० एप्रिल २०२५ पर्यंत मयत खातेदारांच्या वारसांनी वारसा संबंधित आवश्यक कागदपत्रे ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲंड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात हॉस्पिटलने माणूसकी सोडली, जुळ्यांना जन्म देऊन आईने जीव सोडला; आमदाराची पोलिसांत धाव, चौकशी सुरू

, पुणे सांस्कृतिक राजधानी आणि सामाजिक जाणीवा असलेल्या पुण्यातील (झींपिश) दीनानाथ मंगेशकर या धर्मादाय नोंदणी असलेल्या रुग्णालयातच रुग्णसेवेला तडा गेला असून गर्भवती महिलेवर वेळीच उपचार न केल्याने तिचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. एका गर्भवती महिलेला पुण्यातील दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये (कैळिंरश्र) उपचारासाठी दाखल करतेवेळी अगोदर १० लाख रुपये भरावे, त्यानंतरच दाखल केले जाईल अशा पवित्रा रुग्णालय प्रशासनाने घेतला होता. त्यामुळे, संबंधित महिलेला दुसऱ्या रुग्णालयात उपचारासाठी, प्रसुतीसाठी दाखल करण्यात आले. मात्र, दोन जुळ्या मुलींना जन्म दिल्यानंतर दुर्दैवाने महिलेचा मृत्यू झाला. या घटनेवरुन आता सर्वत्र संताप व्यक्त होत असून आमदार अमित गोरखे यांनीही याप्रकरणी पोलिसात धाव घेतली आहे. तर, रुग्णालय प्रशासनाच्यावतीनेही आपली बाजू मांडण्यात आली आहे. पुण्यातील महिलेच्या मृत्यू प्रकरणात दीनानाथ रुग्णालयाकडून रुग्णालयात अंतर्गत चौकशी करण्यात आली आहे.




रुग्णालय प्रशासनाकडून वस्तुस्थिती राज्य सरकारला देण्यात येणार आहे, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे.

तनिषा भिसे यांना पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात दाखल करण्यासाठी आणण्यात आले होते. मात्र उपचारासाठी दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटल प्रशासनाने रुग्णाच्या नातेवाईकांकडे १० लाख रुपयांची मागणी केली. इतके पैसे अचानक कसे आणायचे असा प्रश्न गर्भवती महिलेच्या कुटुंबीयांना पडला. अखेर अडीच लाख भरायला तयार असतानाही रुग्णालय प्रशासनाने गर्भवती महिलेला प्रसुतीसाठी दाखल करून घेतलं नाही. परिणामी तिला इतर रुग्णालयात हलवण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. दुसऱ्या रुग्णालयात हलवत असताना महिलेला त्रास झाला. या महिलेचे पती सुशांत भिसे हे भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक आहेत. रुग्णालयात पत्नीला दाखल करून घेत नाहीत म्हणल्यावर दीनानाथ रुग्णालयाला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून रामेश्वर नाईक यांनी फोन केला. तरीही रुग्णालय प्रशासनाने त्यांचं ऐकलं नाही. परिणामी गर्भवती महिलेने दोन गोंडस जुळ्या मुलांना जन्म दिला मात्र महिलेचा जीव गमावला. या घटनेबाबत आमदार अमित गोरखे यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रारही केली आहे.

दरम्यान, या घटनेसंदर्भात दीनानाथ रुग्णालयाकडून चौकशी केली जाणार असून या संदर्भातील अहवाल आम्ही राज्य सरकारला सादर करणार आहोत. मीडियात सध्या बातम्या येत आहेत, त्या अर्धवट आहेत. त्यांनी केलेल्या आरोपांची चौकशी केली जाणार आहे. त्यामुळे, सध्या मला जास्त बोलता येणार नाही, अशी माहिती दीनानाथ रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी रवी पालेकर यांनी दिली.

महिला आयोगानेही घेतली दखल

पुण्यातल्या दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाने केलेला हलगर्जीपणा, योग्य उपचार न दिल्याने २ जुळ्या मुलींना जन्म दिलेल्या महिलेचा मृत्यू झाल्याची घटना माध्यमातून समोर आली आहे. या प्रकरणाची महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने दखल घेतली आहे. आयोगाने आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना सदर प्रकरणी तथ्य तपासत चौकशी करुन कार्यवाही करण्याचे आणि आयोगास वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, अशी माहिती महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी ट्विटरवरुन दिली आहे.

# गावठी पिस्तूल बाळगल्या प्रकरणी, शिरूर पोलिसांची तिघांविरुद्ध तडीपारीची कारवाई

शिरूर : शिरूर, सरदवाडी व रांजणगाव एमआयडीसी परिसरात वारंवार गावठी पिस्तुल बाळगून, पिस्तुलचा धाक दाखवून धमकावणाऱ्या, हल्ले, मारामाऱ्या आणि बेकायदा जमाव जमवून शांतता भंग करणाऱ्या तिघांविरूद्ध शिरूर पोलिसांनी आज तडीपारीची कारवाई केली.

अभिषेक हनुमान मिसाळ उर्फ घ्या (वय २३, रा. सोनार आळी, शिरूर), शुभम दत्तात्रेय दळवी (वय २९, रा. प्रितम प्रकाश नगर, शिरूर) व गणेश उर्फ श्रीरंग शंकर महाजन (वय ३०, रा. गोलेगाव, ता. शिरूर, जि. पुणे) अशी तडीपारीची कारवाई केलेल्यांची नावे असून, संकेत महामुनी टोळीतील या तिघांना जिल्हा पोलिस अधिक्षक पंकज देशमुख यांच्या आदेशान्वये दोन वर्षांसाठी पुणे व नगर जिल्ह्यांतून हद्दपार करण्यात आले असल्याची माहिती पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली.




शिरूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत सन २०१६ ते २०२४ या कालावधीत संकेत संतोष महामुनी (रा. सरदवाडी, ता. शिरूर, जि. पुणे) याने टोळी बनवून अनेक छोटे - मोठे व गंभीर स्वरूपाचे गुन्हे केले. त्याच्या टोळीतील नेहमीचे सदस्य असलेल्या घ्या, शुभम दळवी व गणेश महाजन यांच्यासह त्याने शिरूर व रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीत गावठी पिस्तुलचा वापर करून खून करण्याचा प्रयत्न, शिवीगाळ, दमदाटी, धमकी, दुखापत करणे, बेकायदेशीर जमाव जमवून शांतता भंग, बेकायदा घातक हत्यारे जवळ बाळगून गुन्हे करण्यासाठी आपल्या टोळीतील इतरांना चिथावणी देणे हे प्रकार वेळोवेळी केल्याने या टोळीविरूद्ध परिणामकारक प्रतिबंधक कारवाई करण्याबाबत जिल्हा पोलिस अधिक्षक देशमुख यांना प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाची दखल घेत त्यांनी संबंधितांना दोन वर्षांसाठी पुणे व नगर जिल्ह्यांतून तडीपारीचे आदेश दिल्याचे केंजळे यांनी सांगितले.

# तोतया पोलिस जेरबंद; २० गुन्ह्यात तब्बल ३० लाखाची लूटमार

पुणे - पोलिस असल्याची बतावणी करत लुटमार करणार्या सराईत गुन्हेगाराला विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून २० गुन्ह्यांचा छडा पोलिसांनी लावला असून, २९ लाख ६७ हजार रुपयांची त्याने फसवणूक आणि लुटमार केल्याचे उघड झाले आहे. हे सर्व गुन्हे त्याने अवघ्या दिड वर्षात केले आहेत. ओळख लपवण्यासाठी तो प्रत्येक गुन्हा हेल्मेट घालून करत होता. जफर शहाजमान ईराणी (४१,रा. लोणीकाळभोर पठारे वस्ती) असे त्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार जफर हा सराईत गुन्हेगार आहे. आत्तापर्यंत त्याच्यावर पुण्यासह इतर जिल्ह्यात ७० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. तो २०२३ मध्ये जामिनावर बाहेर आला होता. गुन्हे करताना तो हेल्मेट काढत नाही. त्याचबरोबर चोरीची गाडी वापरतो. त्या गाडीचा नंबर देखील बदलून टाकतो. एका ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेर्यात तो दिसून आला. त्याची चालण्याची आणि बोलण्याची लकब हेरून पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या. पोलिसांनी २०१७ मध्ये जफरला अटक केली होती. त्यावेळी त्याच्या घरातून दोन किलो सोने आणि ६४ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात



आली होती.

मावशी मी पोलिस आहे तुमच्या इथे चोरी झाली आहे. तुमच्या गळ्यातील गंठण आणि हातातील अंगठी पिशवीत ठेवा, असे म्हणत महिला विरोध करत असताना देखील त्याने जबरदस्तीने ऐवज हिसकावला होता. याप्रकरणी, विश्रामबाग पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास करत असताना, पोलिस उपनिरीक्षक मनोज बरुरे यांना जफर याची माहिती मिळाली. सीसीटीव्हीच्या माध्यमातून त्याची ओळख पटविली. तेव्हापासून विश्रामबाग पोलिस त्याच्या मागावर होते.दरम्यान, जफरच्या घरच्यांवर खूनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल आहे. त्यांना मदत करण्यासाठी तो शहरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यांनुसार पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने २० गुन्ह्यांची कबुली दिली. ही कामगिरी पोलिस उपायुक्त संदिपसिंह गिल्ल, सहायक पोलिस आयुक्त साईनाथ ठोंबरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार, पोलीस निरीक्षक अरुण घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मनोज बरुरे, अंमलदार अशोक माने, मयुर भोसले, सचिन कदम, गणेश काठे,राहुल मोरे, शिवा गायकवाड, अनिस शेख, नितीन बाबर,सागर मोरे यांच्या पथकाने केली.

तोतया पोलिस जेरबंद; २० गुन्ह्यात तब्बल ३० लाखाची लूटमार

पुणे - पोलिस असल्याची बतावणी करत लुटमार करणार्या सराईत गुन्हेगाराला विश्रामबाग पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून २० गुन्ह्यांचा छडा पोलिसांनी लावला असून, २९ लाख ६७ हजार रुपयांची त्याने फसवणूक आणि लुटमार केल्याचे उघड झाले आहे. हे सर्व गुन्हे त्याने अवघ्या दिड वर्षात केले आहेत. ओळख लपवण्यासाठी तो प्रत्येक गुन्हा हेल्मेट घालून करत होता. जफर शहाजमान ईराणी (४१,रा. लोणीकाळभोर पठारे वस्ती) असे त्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार जफर हा सराईत गुन्हेगार आहे. आत्तापर्यंत त्याच्यावर पुण्यासह इतर जिल्ह्यात ७० पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. तो २०२३ मध्ये जामिनावर बाहेर आला होता. गुन्हे करताना तो हेल्मेट काढत नाही. त्याचबरोबर चोरीची गाडी वापरतो. त्या गाडीचा नंबर देखील बदलून टाकतो. एका ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेर्यात तो दिसून आला. त्याची चालण्याची आणि बोलण्याची लकब हेरून पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या. पोलिसांनी २०१७ मध्ये जफरला अटक केली होती. त्यावेळी त्याच्या घरातून दोन किलो सोने आणि



६४ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली होती.

मावशी मी पोलिस आहे तुमच्या इथे चोरी झाली आहे. तुमच्या गळ्यातील गंठण आणि हातातील अंगठी पिशवीत ठेवा, असे म्हणत महिला विरोध करत असताना देखील त्याने जबरदस्तीने ऐवज हिसकावला होता. याप्रकरणी, विश्रामबाग पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तीच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपास करत असताना, पोलिस उपनिरीक्षक मनोज बरुरे यांना जफर याची माहिती मिळाली. सीसीटीव्हीच्या माध्यमातून त्याची ओळख पटविली. तेव्हापासून विश्रामबाग पोलिस त्याच्या मागावर होते.दरम्यान, जफरच्या घरच्यांवर खूनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल आहे. त्यांना मदत करण्यासाठी तो शहरात येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यांनुसार पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत त्याने २० गुन्ह्यांची कबुली दिली. ही कामगिरी पोलिस उपायुक्त संदिपसिंह गिल्ल, सहायक पोलिस आयुक्त साईनाथ ठोंबरे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विजयमाला पवार, पोलीस निरीक्षक अरुण घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मनोज बरुरे, अंमलदार अशोक माने, मयुर भोसले, सचिन कदम, गणेश काठे,राहुल मोरे, शिवा गायकवाड, अनिस शेख, नितीन बाबर,सागर मोरे यांच्या पथकाने केली.

# महापारेषण विभागाचे अधिकारी टॉवर उभे न करता गेले परत; आमदार शरद सोनवणे यांची यशस्वी मध्यस्थी

नारायणगाव : शासनाच्या विद्युतवाहिनीच्या कामाला शेतकऱ्यांचा मुळीच विरोध नाही; तथापि बागायती क्षेत्रात हे टॉवर उभे करण्यापेक्षा पर्यायी जागा उपलब्ध असून, त्या बाजूने ही लाइन न्यावी, अशी शेतकऱ्यांसह माझी मागणी असून, शासनाने त्या बाजूने सर्व्हे करून लाइन तिकडून न्यावी. त्यासाठी लागणारी मदत तालुक्याचा आमदार म्हणून मी करेन, हे आमदार शरद सोनवणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना समजून सांगितल्याने संबंधित अधिकारी टॉवर उभे न करताच मागे फिरले.

बाभळेश्वर-कडूस (मुंबई) विद्युतवाहिनीच्या ४०० के. व्ही. अतिउच्च वाहिनीच्या भूसंपादनास आळे येथील शेतकऱ्यांनी विरोध केला असून, या वाहिनीचे काम गुरुवारी (दि. ३) पोलिस बंदोबस्तात सुरू होणार होते. परंतु, आमदार शरद सोनवणे यांनी शेतकऱ्यांची बाजू मांडत या कामाला तातपुरती स्थगिती आणली आहे. फेरसर्व्हे करून डोंगराच्या



बाजूने हे टॉवर उभारले जावेत, अशी मागणी आमदार सोनवणे यांची आहे.

ही अतिउच्च वीजवाहिनी आळे गावातून जात असून, यासाठी ज्या शेतकऱ्यांच्या शेतात टॉवर उभारण्यात येणार आहेत. त्यांचा यास कडाडून विरोध आहे. सचिन वाळुंज, जयराम भुजबळ, संजय गुंजाळ, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, संजय पाटील कुऱ्हाडे, ज्ञानेश्वर शिंदे, नितीन कुऱ्हाडे, जिजाबाई कुऱ्हाडे, गणेश कुऱ्हाडे, उत्तम भुजबळ, सुजित कुऱ्हाडे, नामदेव कोकणे, पोपट भुजबळ, बाळासाहेब भुजबळ, गेणभाऊ हुलवळे, प्रकाश हुलवळे, संदीप हुलवळे, कारभारी डावखर, गणेश शिंदे, सुभाष कुऱ्हाडे, बबन कुऱ्हाडे, तान्हाजी कुऱ्हाडे, सम्राट कुऱ्हाडे, विलास तितर, तुषार कुऱ्हाडे, बबन शिदे, प्रवीण भुजबळ, रामदास भुजबळ, शिवा कुऱ्हाडे, भीमाजी शिंदे या शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे.या शेतकऱ्यांनी बुधवारी (दि. २) आमदार सोनवणे यांची भेट घेऊन आपली समस्या मांडली. त्यानंतर आमदार सोनवणे यांनी महापारेषणचे अधिकारी संजीव भोळे, अनिल भारसाकळे, मिलिंद भामरे, हर्षद ढवळे, जितेंद्र निकम, तहसीलदार डॉ. सुनील शेळके, उपविभागीय पोलिस अधिकारी रवींद्र चौधर, आळेफाटाचे पोलिस निरीक्षक दिनेश तायडे यांनी प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात जाऊन पाहणी केली. त्या वेळी आमदार सोनवणे यांनी शेतकऱ्यांची बाजू अधिकाऱ्यांसमोर मांडून व समजावून सांगितल्याने या कामाला तातपुरती स्थगिती आली आहे.

दरम्यान, याविषयी आमदार सोनवणे म्हणाले की, या प्रकल्पाला आमचा विरोध नाही. हा प्रकल्प झाला पाहिजे. परंतु, हे टॉवर शेतकऱ्यांच्या बागायती क्षेत्रात उभे करण्याऐवजी बाजूने डोंगराच्या कडेला जागा उपलब्ध आहे, तिकडून पुन्हा सर्व्हे केला तर शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही आणि टॉवरची संख्या देखील कमी होईल. संबंधित विभागाने याबाबतची दखल घेतली आहे. मी शासनाचा प्रतिनिधी म्हणून समन्वयाने निश्चित मार्ग निघेल, याची मला खात्री आहे

# दत्तात्रेय गाडेच्या पोलिस कोठडीचा अर्ज न्यायालयाने दुसऱ्यांदा फेटाळला

पुणे - स्वारगेट अत्याचार प्रकरणातील आरोपी दत्तात्रेय गाडे याची पुन्हा पोलिस कोठडी मिळावी, त्यासाठी गुन्हे शाखेने दुसऱ्यांदा केलेला अर्ज देखील न्यायालयाने फेटाळला आहे. पोलिसांनी अर्जात



पुन्हा पोलिस कोठडी मिळण्याबाबत ठोस कारण दिल्याने न्यायालयाने पहिला अर्ज बुधवारी (ता.२) फेटाळून लावला होता. त्यामुळे पोलिसांनी गुरुवारी (ता. ३) पुन्हा अर्ज केला आहे. तो देखील न्यायालयाने फेटाळला.

या गुन्ह्यात गाडेला २८ फेब्रुवारीला अटक केल्यानंतर त्याला १२ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती. याबाबत एका २६ वर्षीय तरुणीने स्वारगेट पोलिस ठाण्यात अत्याचार झाल्याची तक्रार दिली होती. पोलिसांनी या प्रकरणात भक्कम पुरावे जमा केले असून त्यामध्ये आधुनिक थ्रीडी तंत्रज्ञान वापरून पोलिस त्याची अधिक चौकशी करणार होते.

परंतु, यामध्ये त्याची चालण्याची स्टाईल तसेच त्याच्या छोट्या-छोट्या लकबी या माध्यमातून तपासून पुराव्यांमध्ये त्याचा समावेश केला जाणार होता. मात्र न्यायालयातून गाडेच्या ताब्यात घेण्याची परवानगी मिळाली नाही.

ही सर्व प्रक्रीया पार पाडता यावी व गुन्ह्यातील तपासातील काही बाबींवर विचारपूस करण्यासाठी त्याची पोलिस कोठडी पोलिसांना हवी होती. त्यासाठी पोलिसांनी न्यायालयाकडे अर्ज दाखल केला होता. मात्र तो अर्ज फेटाळण्यात आला आहे.

बचाव पक्षाच्या वकील ॲड. वाजेद खान-बिडकर यांनी बाजू मांडली. या गुन्ह्यात यापूर्वी आरोपीला पुरेशी पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. तसेच आरोपीचे पोलिस चौकशीस सहकार्य आहे. पोलिसांना आवश्यक असलेला तपास ते आरोपी न्यायालयीन कोठडीत असतानाही करू शकतात, असा युक्तिवाद ड. खान यांनी केला.

# पुणे शहरासह जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह अवकाळी पावसाची हजेरी

पुणे - पुणे शहर आणि परिसरात आज, ३ एप्रिल रोजी अवकाळी पावसाने हजेरी लावली. शहरात सर्वदूर पावसाला सुरुवात झाली असून, विजांच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह पाऊस कोसळत आहे. पुणे जिल्ह्यतील अनेक भागात आज पाऊस पडत आहे.



या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला तरी परिसरातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये चिंतेचं वातावरण आहे. आकाशात ढग दाटून आल्याने पुढील काही काळ पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान पुणे विभागाचे माजी प्रमुख आणि शास्त्रज्ञ के. एस. होसाळीकर यांनीही राज्यातील हवामानाचा ताजा अंदाज जाहीर केला आहे.

पुण्यात दुपारपासूनच आकाश ढगांनी भरलं होतं आणि सायंकाळी पावसाने जोर धरला. या पावसाने उकाड्यापासून दिलासा दिला असला तरी आंबा बागायतदारांसाठी तो धोक्याची घंटा ठरला आहे. सध्या आंब्याचा हंगाम जोमात असून, अवकाळी पाऊस आणि वादळामुळे फळगळ किंवा आंब्याला तडे जाण्याची भीती आहे.

# कडबनवाडी येथे गोवंश जनावरांची प्रचंड कत्तल; चौदाशे किलो मांस जप्त

**शेळगाव : कडबनवाडी(ता.इंदापूर) पठाणवस्ती येथील दादा पठाण यांच्या शेतात अवैधरित्या गोवंश वासरांची कत्तल केलेले चौदाशे किलो गोमांस वालचंदनगर पोलिसांनी जप्त केले असून पोलीस कारवाई मुळे ५५ वासरे ही कत्तल होण्यापासून वाचली असून त्यांना माळशिरस तालुक्यातील मेडद येथील श्रीनाथ गोशाळेत निगा राखण्यासाठी हलवण्यात आले आहेत.**

छोटेसे गाव असलेल्या कडबनवाडी या ठिकाणी घडलेल्या प्रकाराने इंदापूर तालुक्यात प्रचंड खळबळ उडाली आहे. गोहत्येचे मोठे रॉकेट असण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. पोलिसांनी कसून चौकशी करून गोहत्येचे रॉकेट शोधून काढावे अशी देखील मागणी होत आहे. वालचंदनगर पोलिसांनी दादा पठाण व इतर सात ते आठ अज्ञातावर गुन्हा दाखल केला असून अद्याप आरोपींना अटक झालेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार गुरुवारी (दि. ३) रोजी मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास पोलीस उपनिरीक्षक विजय टेळकीकर, हवालदार गणेश काटकर, वाहन चालक हवालदार किसन बेलदार, पोलीस जवान विक्रम मोरे गस्त घालत असताना चालक पोलीस हवालदार किसन बेलदार यांना पोलीस हवालदार गुलाब पाटील यांच्याकडून कडबनवाडी गावाच्या हद्दीत पठाणवस्ती येथे दादा पठाण यांच्या शेतात वासरांची कत्तल करत आहेत अशी गोपनीय बातमी मिळाली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डूनगे यांच्या आदेशानुसार पोलीस हवालदार गणेश काटकर, वाहन चालक पोलीस हवालदार किसन बेलदार, पोलीस कॉन्स्टेबल विक्रम मोरे, पोलीस हवालदार दादासाहेब डोईफोडे, पोलीस शिपाई अमोल सोनवणे तसेच पोलीस उपनिरीक्षक विजय टेळकीकर यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केले असता पोलीस आल्याची चाहूल लागताच आरोपी अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले.त्या ठिकाणी पोलिसांना महिंद्रा कंपनीची पांढऱ्या रंगाची चारचाकी गाडी चक ४२ बी एफ ७४७८ व दुसरी महिंद्रा कंपनीची नंबर प्लेट नसल्याने चारचाकी पिकअप आढळून आली तसेच चौदाशे किलो कापलेले तसेच तुकडे केलेले गोमांस, इलेक्ट्रिक वजन काटा, प्लास्टिकचे बॅनर, प्लास्टिकचा टब, स्टीलच्या बादल्या, दोन लोखंडे धारदार चाकू असे मिळून ९ लाख १६ हजार किमतीचे मुद्देमाल त्या ठिकाणी पोलिसांना मिळून आले तसेच सिमेंटच्या हौदात वासरांचे हाडे शिंगे व बाजूला रक्तात पडलेले मांस आढळून आले.

घटनास्थळी पशुधन विकास अधिकारी डॉ. रमेश पाटील व डॉ. अरुण ननवरे व डॉ. संतोष भारती यांनी गोमांस चे नमुने पुढील तपासणीसाठी ताब्यात घेतले.त्यानंतर त्या ठिकाणी कापलेले गोमांस दोन पंचासह जेसीबीच्या साह्याने सुमारे सहा तास माती बुजून नष्ट केले तसेच हौदाच्या बाजूला ओरडण्याचा आवाज येईल म्हणून गाईचे ५५ वासरे हे तोंडाला व पायाला बांधलेल्या अवस्थेत मिळून आली. त्या ५५ वासरे टेम्पो मध्ये भरून माळशिरस तालुक्यातील मेडद येथील श्रीनाथ गोशाळा या ठिकाणी निगा राखण्यासाठी कायदेशीर कारवाई करून ताब्यात देण्यात आली.

पोलीस जवान आकाश प्रधान यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार कडबनवाडी पठाणवस्ती येथील दादा पठाण व इतर अज्ञात सात ते आठ जणांवर महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम व पशुक्रूरता अधिनियम कलम नुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून आरोपींना अद्याप अटक करण्यात आलीनाही. कडबनवाडी या छोट्याशा गावामध्ये कधीपासून हे जनावरांचे कत्तल करण्याचा प्रकार सुरू होता व कोण करत होतं याचा उलगडा लवकरच वालचंदनगर पोलीस करतील अशी अपेक्षा शेळगाव व कडबनवाडी परिसरातील नागरिकांना व्यक्त केली आहे.